गुरुवार, १० ऑगस्ट २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● THURSDAY 10 AUGUST 2023 adhunikkesari.com Adhunik Kesari ● YEAR-03 ● ISSUE-15 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5



## एसटी बसला आग; चालकाचे प्रसंगावधान

आधुनिक केसरी न्यूज

**बी.डी.रामपूरकर**

**जिंतूर :** आगारातील बस जिंतूर ते दिग्रस मार्गे येलदरी गाडी नं. MH20 BL 0503 ही बस मंगळवार दि. 8 ऑगस्ट रोजी सकाळी 6:45 वाजता जिंतूर बस स्थानकातून निघाली असता जिंतूर पासून दहा किलोमीटर अंतरावर माणकेश्वर पाटी जवळ गेल्यानंतर अचानक गाडीत प्रवाशांना बाहेर वायर जळल्याचा वास येत होता. त्यावेळी प्रवाशांनी ही बाब चालक यांच्या लक्षात आणून दिली असता गाडी चालकाने प्रसंगावधान राखून बस रस्त्याच्या कडेला उभी केली व बोनट उघडल्यास अचानक जाळ बाहेर आल्याने गाडी पेटल्यांच्या लक्षात आल्याने बसमधील प्रवासी घाबरलेल्या अवस्थेत एकमेकांना धक्के देत कसेबसे गाडी बाहेर पडले. बस चालक चाटे यांनी प्रसंगावधान राखून आग आटोक्यात आणण्यासाठी रोडच्याकडेचे गवत व छोटी छोटी झाडे घेऊन प्रयत्न करून व शेतकऱ्यांनी पाणी आणून आग आटोक्यात आणली. या सर्व प्रकारामुळे प्रवाशांना मात्र त्रास सहन करावा लागला.

# मणिपूरची घटना लाजीरवाणीच



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** मणिपूरमध्ये हिंसेचे तांडव झाले आहे यात काही शंकाच नाही. आम्ही त्याचे समर्थन करण्याचा काही प्रश्नच उद्भवत नाही. मणिपूरची घटना लाजिरवणीच आहे. मणिपूरमध्ये अशा घटना, दंगली घडणे हे अत्यंत वाईट आहे, मात्र यावर राजकारण करणे हे घडलेल्या घटनांपेक्षा वाईट आहे, असे गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले. त्यानंतर लोकसभेत एकच गदारोळ सुरु झाला. मणिपूरच्या प्रकरणावर एक असा समज पसरवला जातो आहे की आमच्या सरकारला यावर चर्चा नको. मात्र मी या लोकसभेला सांगू इच्छितो मी पत्र लिहून अध्यक्षांना सांगितले होते की मणिपूरच्या प्रश्नावर चर्चा झाली पाहिजे, असेही अमित शाह म्हणाले.

## अमित शाह : राजकारण नको

पहिल्या दिवसापासून आम्ही चर्चेला तयार आहोत. मात्र विरोधकांना चर्चा नकोय फक्त विरोध करायचा आहे. पंतप्रधानांनी तुमच्या मागणीचा विचारही केला असता मात्र मलाही तुम्ही बोलू दिले नाहीत. ही कुठल्या प्रकारची लोकशाही आहे ? तुम्हाला काय वाटते आरडा ओरडा करुन आमचा आवाज तुम्ही शांत कराल का ? १३० कोटी जनतेने आम्हाला निवडून दिले आहे तुम्ही आमचा आवाज दाबू शकत नाही.

मागच्या साडेसहा वर्षांपासून मणिपूरमध्ये भाजपाचे राज्य आहे. मणिपूरमध्ये भाजपाचे सरकार आले तेव्हापासून ३ मे पर्यंत एक दिवसही कर्फ्यू लावावा लागला नाही. मागच्या सहा वर्षात एकही मणिपूर एकदा बंद झाले नाही. दहशतवाद्यांचा हिंसाचार जवळपास संपला. २०२१ मध्ये म्यानमारमध्ये सत्ता बदल झाला. त्या ठिकाणी लष्करी राजवट आली. तिथे कुकी डेमोक्रेटिक फ्रंट आहे. त्यांनी लोकशाहीसाठी आंदोलन सुरु केले. त्यानंतर तिथल्या सरकारने या सगळ्यांवर दबाव आणायला सुरुवात केली. त्यानंतर म्यानमारची जी सीमा आहे जिथे कुंपण नाही. ते आज काढले आहे असे नाही ते १९६८ पासून नाही. त्यामुळे तिथून काही कुकी शरणार्थी इथे येऊ लागले. त्यांचा संघर्ष म्यानमारच्या लष्कराशी होता. त्यानंतर कुकी कुटुंब मणिपूरमध्ये येऊ लागली. त्यामुळे मणिपूरमध्ये असुरक्षिततेची भावना येणे सुरु झाली. त्यानंतर आम्ही निर्णय घेतला की तिथे कुंपण घालायचे. १० किमी कुंपण आम्ही घातले आहे. ६० किमी कुंपण घालण्याचे काम सुरु आहे. तर ६०० किमीचा आढावा आम्ही घेत आहोत. तुम्ही (विरोधकांनी) २०१४ पर्यंत कधीही फेन्सिंग केले नाही. मात्र आता तिथे काम सुरु केले.

जानेवारी महिन्यापासून जे शरणार्थी आले होते त्यांना ओळखपत्र देण्यास सुरुवात केली. आधार कार्डच्या निगेटिव्ह यादीत टाकले. २०२३ मध्ये दंगली झाल्या. २०२२ मध्ये आम्ही फेन्सिंग सुरु केले होते. तरीही ज्या लोकांच्या येण्याचे प्रमाण वाढले त्यामुळे मेईतेई लोकांमध्ये असुरक्षितेतची भावना वाढली. पासपोर्ट लागत नाही हा करार १९६८ मध्ये झाला आहे. त्यानंतर एक २९ एप्रिलला अफवा पसरली गेली की शरणार्थी लोकांच्या ५८ वसाहतींना गाव घोषित केले. त्यातून अविश्वास निर्माण झाला. त्यानंतर आगीत तेल टाकण्याचे काम मणिपूरच्या उच्च न्यायालयाने केले. भारत सरकार भू मंत्रालय, मणिपूर सरकार यांचे काहीही म्हणणे जाणून घेतले नाही आणि निर्णय दिला गेला २९ एप्रिलपर्यंच्या मेईतेई जाती भटक्या जाती आहेत. यामुळे असंतोष निर्माण झाला.

# राष्ट्रध्वज वितरण केंद्राचे आयुक्तांच्या हस्ते उद्घाटन

## मनपाची ६ केंद्रे व महिला बचत गटांमार्फत वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शासनाच्या सुचनेप्रमाणे आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत १३ ते १५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत 'घरोघरी तिरंगा ' हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत नागरिकांनी आपल्या घरावर राष्ट्रध्वज उंचावीणे अपेक्षित आहे. मनपा संलग्न कार्यालये व महीला बचत गट मार्फत नागरिकांना राष्ट्रध्वज उपलब्ध करून देण्यासाठी मनपा प्रशासनाने नियोजन केले आहे. याअंतर्गत ९ ऑगस्ट रोजी मनपा मुख्य कार्यालय येथे राष्ट्रध्वज वितरण केंद्राचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. नागरीकांना ध्वज सहजतेने उपलब्ध व्हावा यादृष्टीने महानगरपालिकेतर्फे नियोजन करण्यात आले असुन मनपाची मुख्य इमारत, ३ झोन कार्यालये, आझाद गार्डन चौक येथील बेघर निवारा केंद्र, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान कार्यालय ज्युबिली



हायस्कूल अशा ६ केंद्रांवर ध्वज वितरण सुरु करण्यात आली असुन मनपाच्या सहकार्याने ४० महीला बचत गटांमार्फत सुद्धा ध्वज वितरण केले जात आहे. ध्वजसोबतच राष्ट्रध्वजाचा वापर व सन्मान कसा करावा यासंबंधी ध्वजसंहिता असलेले परिपत्रक सुद्धा दिले जात आहे. देशातील प्रत्येक नागरिकाच्या मनात देशभक्ती जागृत करणे हा हर घर तिरंगा अभियानाचा उद्देश आहे. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनी आपल्या घरी तिरंगा फडकवून उत्साहात साजरा करून अभियानात सर्व नागरीकांनी सहभागी होण्याचे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे. या प्रसंगी उपायुक्त मंगेश खवले, मनोहर बागडे, अनिल घुले, रवि हजारे, विकास दानव, रफीक शेख, डॉ. नरेंद्र जनबंधू , प्रदीप पाटील, रोशनी तपासे, अनिल बनकर, मयुर मलिक व कर्मचारी उपस्थित होते.

# फ्लाइंग किस प्रकरणी प्रियंका चतुर्वेदींनी केली राहुल गांधींची पाठराखण

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** मोदी आडनावावरून केलेल्या टिप्पणीप्रकरणी काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांना सुरत सत्र न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेस सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतर राहुल गांधी यांना पुन्हा खासदारकी बहाल करण्यात आली. त्यानंतर बुधवारी राहुल गांधी लोकसभेतही परतले. लोकसभेत परतल्यावर केलेल्या पहिल्याच भाषणात राहुल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर शाब्दिक हल्ला चढवला. राहुल गांधी यांच्यासह विरोधी बाकांवरील खासदारांनी मणिपूर प्रश्नावरून केंद्र सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, सभागृहात राहुल गांधींनी केलेल्या एका कृतीमुळे राजकीय वातावरण तापले.

भाषण केल्यानंतर राहुल गांधी यांनी लोकसभा सभागृह सोडले. राहुल गांधी बाहेर पडत असताना त्यांच्या हातातल्या काही फाईल्स खाली पडल्या. त्या फाईल्स उचलण्यासाठी राहुल गांधी खाली वाकले. तेव्हा तिथे बसलेले भाजपा खासदार राहुल गांधींवर हसले. भाजपा खासदारांच्या या कृतीला प्रत्युत्तर म्हणून राहुल गांधींनी या सर्व खासदारांना पाहून फ्लाइंग किस दिलं. यानंतर भाजपाच्या महिला खासदारांनी लोकसभा अध्यक्षांकडे तक्रार दाखल केली. असभ्य वर्तनासाठी राहुल गांधींवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. या सर्व घडामोडींनतर ठाकरे गटाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी राहुल गांधींची पाठराखण केली आहे. तुम्हाला द्वेष करण्याची एवढी सवय झाली आहे, की राहुल गांधींनी प्रेम आणि आपुलकीने केलेली कृतीही तुम्हाला समजत नाही. तुम्ही त्यांच्याविरोधात विष ओकत असताना, ते तुमच्याशी प्रेमाने वागत आहेत, अशी प्रतिक्रिया प्रियंका चतुर्वेदी यांनी दिली. राहुल गांधींनी सभागृहात दिलेल्या फ्लाइंग किस प्रकरणावर भाष्य करताना प्रियंका चतुर्वेदी म्हणाल्या, राहुल गांधी सभागृहात बोलत असताना भाजपाचे सर्व मंत्री उभे राहिले होते. ते सर्वजण भाषणात अडथळा निर्माण करत होते. तरीही राहुल गांधी यांनी त्यांच्याकडे पाहून प्रेमळ हावभाव दिले. याची त्यांना काय अडचण झाली. त्यांना द्वेष करण्याची एवढी सवय झाली आहे की त्यांना प्रेम आणि आपुलकीने केलेली कृतीही समजत नाही.

# शालेय अभ्यासक्रमात 'गुड टच बॅड टच'चा समावेश व्हावा

## अभिनेत्री तनिशा मुखर्जी : ग्रॅव्हिट्स फाऊंडेशनतर्फे लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी जागृती


आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मुलांमध्ये चांगल्या-वाईट स्पर्शाची जाणीव करून देणारा 'गुड टच बॅड टच' उपक्रम व्यापक होण्यासाठी त्याचा शालेय अभ्यासक्रमात समावेश व्हायला हवा. लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी अशा उपक्रमांना शासकीय स्तरावरून पाठबळ मिळायला हवे, अशी अपेक्षा प्रसिद्ध अभिनेत्री तनिशा मुखर्जी यांनी व्यक्त केली. आपल्याला जाणवणाऱ्या चुकीच्या स्पर्शाबद्दल वेळीच आवाज उठवायला हवा, अशी भूमिका त्यांनी यावेळी मांडली. ग्रॅव्हिट्स फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या 'गुड टच बॅड टच' या उपक्रमाविषयी तनिशा मुखर्जी यांनी बुधवारी पुण्यात माध्यमांशी संवाद साधला. यावेळी फाउंडेशनच्या अध्यक्षा उषा काकडे उपस्थित होत्या. शाळांमधून हा उपक्रम राबवून मुलांमध्ये स्पर्शज्ञान



जागृत करण्याचे महत्वाचे काम सुरु असल्याचे सांगून मुखर्जी यांनी उषा काकडे व फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी काकडे यांनी ग्रॅव्हिट्स फाउंडेशन व 'गुड टच बॅड टच' उपक्रमाचा लेखाजोखा असलेली पुस्तिका देऊन मुखर्जी यांचे स्वागत केले. तनिशा मुखर्जी म्हणाल्या, लहान मुलांवरील, महिलांवरील अत्याचाराच्या घटना दुःखदायक आहेत. हे अत्याचार रोखण्यासाठी कायद्याच्या अंमलबजावणीसह समाजात जागृती होणेही तितकेच महत्वाचे आहे. अनेकदा अशा घटना दाबण्याचा प्रयत्न केला जातो. लहान मुले कधीही खोटे बोलत नाहीत. त्यामुळे पालकांनी, शिक्षकांनी मुलांशी नियमित संवाद ठेवून त्यांचे म्हणणे ऐकून घ्यायला हवे. मनमोकळा संवाद ठेवला पाहिजे. आपल्या शरीरावर आपला अधिकार असतो. त्यामुळे आपल्याला न आवडणाऱ्या स्पर्शावर प्रतिक्रिया दिली पाहिजे. विश्वासातील व्यक्तीला याबाबत अवगत करावे. या उपक्रमात मी स्वतः सहभागी होणार असून, येत्या काळात गुड टच व बॅड टच याविषयी जागृती करण्यावर भर देणार आहे. उषा काकडे म्हणाल्या, "दिल्लीतील निर्भया घटनेनंतर सामाजिक जाणिवेतून आम्ही हा उपक्रम हाती घेतला. सुरुवातीला शाळांमधून, पालकांकडून काहीसा नकार मिळाला. परंतु, नंतर हा उपक्रम अतिशय यशस्वी झाला. ग्रॅव्हिट्स फाउंडेशनच्या माध्यमातून पुण्यातील विविध शाळांमध्ये हा उपक्रम सुरु आहे. आजवर साडेचार लाख विद्यार्थ्यांना चांगल्या व वाईट स्पर्शाची जाणीव करून दिली आहे. प्रशिक्षित स्वयंसेवकांची टीम यामध्ये काम करते. अनेक घटना यातून समोर येत असून, त्यावर उपाययोजना केल्या जात आहे. जागृतीसाठी 'उडने दो' हा लघुपट बनविला आहे. 'गुड टच बॅड टच' उपक्रम देशव्यापी व्हावा, यासाठी आम्ही सरकारकडेही मागणी करणार आहोत.



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

या विश्वाची निर्मिती करणारा परमेश्वरही जणू एक कुंभारच ! तो तर किती वेगवेगळ्या प्रकारे या जगाला आकार देतो, किती वेगवेगळ्या प्रकारचा निसर्ग, माणसे, प्राणी निर्माण करतो. असे विचार त्यांच्या मनात तरळून गेले.
पुढे गेल्यानंतर एका गल्लीत सुतार लोकांनी लाकडापासून केलेल्या काही वस्तू मुलांना बघायला मिळाल्या. अशा प्रकारे खेडेगावातील लोकांचे उद्योग प्रत्यक्ष कसे चालतात ते मुलांना बघायला मिळाले. मुले या सगळ्या गोष्टी बघायला मिळाल्याने बेहद्द खुश होती. आता संध्याकाळ झाली होती. सूर्यनारायण निरोप घेण्याच्या तयारीत होते. श्यामराव सोपानला म्हणाले, ' सोपानराव, आता आम्हाला निघण्याची परवानगी द्या. मुले पण थकली आहेत. घरी जाऊन विश्रांती घेऊ. ' परवानगी नाही अजिबात. आपण आता घरी जाऊ. निर्मलानं तुमच्यासाठी मस्तपैकी जेवण तयार केलं असणार. तुमी आता मस्त जेवण करायचं. खूप दिवसांनी आलायसा. रातभर ऱ्हावा. रातीला मस्तपैकी गप्पा मारू. आराम करायचा अन मंग सकाळी न्याहारी करून निघायचं. त्याबिगर मी सोडणार नाही तुम्हाला. ' सोपानराव म्हणाले. श्यामराव हसले. ' तू असा सोडणार थोडाच आहेस बाबा आम्हाला. चला रे बाळांनो, आज सोपानकाकांकडे जेवण अन मुक्काम. ' राजेश आणि पिंकीनं आनंदाने टाळ्या वाजवल्या आणि सगळे सोपानरावांच्या घरी गेले. श्यामराव, श्यामलाताई, पिंकी आणि राजेश यांनी मग रात्री सोपानरावांकडेच रात्री मुक्काम केला. दिवसभरच्या प्रवासाने सगळेच थकले होते आणि फिरल्यामुळे आणि गावाकडील मोकळ्या हवेत भूकही छान लागली होती. निर्मलाताईंनी मग सगळ्यांसाठी कळण्याच्या पिठाच्या गरम गरम भाकरी, तांबड्या भोपळ्याची भाजी, वांग्याचे चवदार भरीत, नागलीचे पापड, लसूण, कोथिंबीर घालून केलेला हिरव्या मिरच्यांचा ठेचा आदी फर्मास बेत केला होता. कळण्याची चवदार भाकरी तर मुलांना फारच आवडली. सगळे नेहमीपेक्षा जरा जास्तच जेवले. श्यामलाताई निर्मलाताईंना म्हणाल्या, ' वहिनी, अहो घरी मुलं भाकरी म्हटली की तोंड वाकडं करतात आणि आज बघा इथे आवडीने खाताहेत. ' राजेश म्हणाला, ' आई, काकूंनी केलेल्या भाकरीना वेगळीच चव आहे. मला तर हे गरमगरम जेवण खूपच आवडले. ' सोपानराव म्हणाले, ' चला, आमचा खेड्यातील पाहुणचार तुम्हाला आवडला याचा आनंद झाला. तुम्हाला वाटलं तर तुम्ही पुन्हा कधीही या. तुम्हाला आवडेल तो बेत करू या. काय निर्मलाबाई, बरोबर आहे का मी काय म्हणतो ते ?' ( **क्रमशः** )



## समृद्ध प्राचीन वारसा



## आनंदी पहाट

# सुख आनंद व दुःख अनुभव देतात

आधुनिक केसरी

आपल्या शरीराचे चोचले पुरवायला आपण नेहेमीच इच्छुक आणि उत्सुक असतो. पण मनाला आनंद देऊ करण्यासाठी आपण कंजुषी करतो. आपला नेहेमीच दृश्य गोष्टींवर विश्वास असतो त्यामुळेच आपलं प्राधान्य शारीरिक गरजांची पूर्तता करण्यासाठी दिलं जातं, त्यासाठी आपण उतावीळ झालेले असतो. न दिसणाऱ्या मनाचा, मनातल्या मनात, मनमुरादपणे, मनापासून अथवा मनमारूनही आपण विचार का बरं करत नाही ? मनाला आनंदी करण्यासाठी खरं तर केवळ सकारात्मक विचारांची जरुरी असते. शरीराला सुखावण्यासाठी, जगाच्या पाठीवर कोठेही गेलं तर, सर्व काही विकत घेता येऊ शकतं; पण सकारात्मक विचार मात्र आपल्या अंतर्मानातच प्रसूत व्हावे लागतात. ते काही विकत मिळत नाहीत आणि त्याची अनुभूतीही मिळत नाही. आपल्या दृष्टिकोनावर आपले अनुभव संचित होत असतात. हे अनुभव सुख-दुःखाचे म्हणजेच संमिश्र स्वरूपाचे असतात. अनेकदा दुःख अधिक आणि सुख मात्र अगदी थोडं आपल्या वाट्याला आलं असल्याचं म्हंटलं जातं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या विचारांत सकारात्मकता आणल्याने येणारा अनुभव आणि त्याद्वारे मिळणारा आनंद निश्चितच आंतरिक समाधान आणि मानसिक शांती देणारा असतो. प्रत्येक बाबीकडे खिलाडू वृत्तीने बघितलं, आनंदाने प्राप्त परिस्थितीचा स्वीकार केला तर आपल्या जीवनशैलीत नक्कीच बदल घडून येऊ शकतात. चांगल्या माणसांची एक साखळी तयार करण्याचा आपला नेहेमी प्रयत्न असावा. आपण नेहमीच भेटू अगर न भेटू परंतू आपले चांगले विचार नक्कीच एकमेकांपर्यंत पोहोचत राहू शकतात. चांगली भूमिका, चांगली ध्येय आणि चांगले विचार असणारे लोक नेहमी आठवणीत राहतात - मनातही, शब्दातही आणि आयुष्यातही. जेवणातल्या मीठाप्रमाणे जीवनात चव आणणाऱ्यांपैकी आणि जीवनाची गोडी वाढवणाऱ्यापैकी आपण एक असावं आणि आपल्या जीवनाला सार्थकता प्राप्त करून घ्यावी.



आधुनिक केसरी

## कृष्णार्पण आता | प्रेम माझे ||

प्रेमाने फुलते | आयुष्याचे गाणे ||
जगणे मरणे | प्रेमापायी ||१||
प्रेमावीन नाही | जगी या आधार ||
प्रेम हेचि सार | जाणून घे ||२||
प्रेमाचा हा मार्ग | प्रेमाने चालावा ||
प्रेमाने पाळावा | प्रेमभाव ||३||
भोग नसे प्रेम | असे प्रेम त्याग ||
प्रेम अनुराग | अनाहत ||४||
मातेच्या उदरी | प्रेमाचा सोहळा ||
ज्ञानीयांचा मळा | प्रेमानंद ||५||
प्रेम हे अभंग | प्रेम हीच गाथा ||
कृष्णार्पन आता | प्रेम माझे ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी


धर्मार्थकाममोक्षाणां दानं यच्छसि मातृके |
दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् ||
६२ || हे मातृके, तू धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांचे दान देतेस. दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

योग यज्ञ बहु प्रकृति में, संयम नियम अचार ।
सो सब कर्म बिडम्बना, मुल कारण संसार
।।४८।।(स्वर्वेद पंचम मण्डल द्वादश अध्याय)
०५/१२/४८
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
प्रकृती जगतातील योग, यज्ञ तसेच बऱ्याच प्रकारचे संयम, नियम आणि आचार आहेत. हे सर्व कर्म व्यवहार आहेत, ज्यांच्याद्वारे प्राकृतिक लाभ प्राप्त होतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ३९वे

श्रीमहाराजांचे रूप आता पालटले
साधुबुवाचे- गणुबुवा गृहस्थ झाले
आपल्या मुलाचे मन प्रपंची रमलेले
पाहुनी माय-बाप दोघे संतोषले ।।१ ।।

दप्तर रावजींचे कुलकर्णीपणाचे
सांभाळणे श्रीमहाराजानी स्वीकारले
कुलकर्णीपणाची सर्व कामे त्यांनी
मानले सदैव मोठ्या जबाबदारीचे ।।२ ।।

श्रीमहाराजांच्या रूपाने आता गावाला
सज्जन, व्यवहारदक्ष, चौफेर असा हा
कल्याणकारी भावनेचा जनहितकारी
कार्यकुशल असा कुलकर्णी लाभला ।।३ ।।

श्रीमहाराजांचे घर माणसांनी आता
राहू लागले नित्य हो गजबजलेले
आनंदून गेली जनता आता गावची
जन सारे आभार देवाचे मानू लागले ।।४।

चरितावली लेखनात जन हो आता
अरुणदासाचे मन पुरते रमले..




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## नामस्मरण व एकाग्रता

आधुनिक केसरी

नामस्मरण करताना चित्त एकाग्र का होत नाही ? त्याकरिता काय करावे ? नामस्मरण करीत असताना हजार तऱ्हेचे विचार मनात येतात हे खरे. त्यांना आवरण्याचा पहिला उपाय म्हणजे त्या विचारांच्या मागे न जाणे. विचार मनात आले तर त्या विचारांना फाटे फोडून ते वाढवू नयेत; म्हणजेच मनोराज्य करू नये. विचार जसे येतील तसे जातील, तिकडे लक्ष देऊ नये. चित्त एकाग्र होण्याकरताच नामस्मरणाची गरज आहे. चित्ताची एकाग्रता ही फार पुढची पायरी आहे. चित्त चंचल आहे. त्याला कुठेतरी स्थिर करून ठेवल्याशिवाय भागत नाही, म्हणून ते नामात गुंतवून ठेवावे. नामस्मरण करीत असताना ते नाम आपल्या कानांनी ऐकावे, म्हणजे एकाग्रता व्हायला मदत होईल. एकाग्रता झाल्याशिवाय नाम घेण्यात अर्थ नाही, आणि नामाशिवाय एकाग्रता होणार नाही, या संशयात न पडता साधे, सोपे नाम घ्यावे म्हणजे आपोआप एकाग्रता येईल. दुसरी गोष्ट अशी की, ज्याची आपल्याला आवड असते त्यात आपल्याला एकाग्र होता येते. आपल्याला विषयाची आवड असते म्हणून विषयाचे सेवन करताना आपण एकाग्र होतो; मग त्याचप्रमाणे विषयाच्या ऐवजी आपण परमात्म्याची आवड धरली तर त्याच्या ठिकाणीही एकाग्र होता येणार नाही का ? म्हणून, आज विषयाची जितकी आवड आहे तितकीच देवाच्या प्राप्तीबद्दलही आवड ठेवावी, म्हणजे आपल्याला त्याच्या ठिकाणी एकाग्र होता येईल. एकाग्र होणे म्हणजे त्या ठिकाणी समरस होणे. मीठ पाण्यात टाकले म्हणजे ते पाण्याहून वेगळे राहते का ? योग केल्याने एकाग्र होता येईल खरे, पण जोपर्यंत समाधी आहे तोपर्यंतच ती एकाग्रता टिकेल. सर्वांभूतीं भगवद्भाव पाहणे हेच खरे एकाग्रतेचे साधन. सर्व ठिकाणी तोच भरलेला आहे असे समजल्यावर द्वैत कुठे राहिले ? आणि जिथे द्वैत गेले तिथे आपोआप एकाग्रता आलीच. अशी एकाग्रता साधते तीच खरी समाधी होय.



मनुष्य अगदी एकटा असला किंवा एकांतात असला तरी आपल्या कल्पनेने तो अनेक माणसे आपल्या भोवती गोळा करतो. विशेषतः विद्वान लोकांना कल्पना जास्त असतात. तेव्हा कल्पना करायचीच तर ती भगवंताविषयी करू या. भगवंत हा दाता आहे, त्राता आहे, सुख देणारा आहे, अशी कल्पना आपण करू या; त्यातच खरे हित आहे. कल्पनेच्या पलीकडे असणारा परमात्मा आपण कल्पनेत आणून सगुण करावा, आणि तिथेच आपले चित्त स्थिर करण्याचा प्रयत्न करावा.

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

तरीपण तो ऐकेना, एवढ्यात त्याचा बाप तिथे आला. त्यानेही मुलाला पुष्कळ सांगून पाहिले, पण तो ऐकेना, मग त्या मुलाला बापाने धाक दाखवून आणि मार देऊन घरात नेले. आता, मुलाला मारले म्हणून तुम्ही बापाला दोष द्याल का ? "एकुलता एक मुलगा, नवस करून झालेला, त्याला जाऊ दिले असते तर काय झाले असते ?" असे म्हणाल का ? नाही ना ? तर मग गुरू करी काय करीत असतो ? आपण विषय मागत असतो आणि ते दिले तर आपण त्यात बुडून मरू हे त्याला माहीत असते; म्हणूनच तो आपल्याला त्यातून वाचविण्यासाठी चार गोष्टी सांगून पाहतो. आपण तेही न ऐकले, तर तो आपत्ती वगैरे आणून धाक दाखवितो. आपण त्याबद्दल रडत असलो तरी तो आपल्याला त्यातून वर ओढीतच असतो. आपण तर चांगले शिकले-सवरलेले. त्या मुलाप्रमाणे अज्ञान नसून चांगले वयस्कर; तरीसुद्धा आपल्याला विषयात उडी घ्यावीशी वाटते. ? क्रमशः



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

ऋणशेपञ्चानिशेषः शत्रुशेषस्तथैव च ।पुनः पुनः प्रवर्तन्ते तस्माच्छेषं न रक्षयेत् ॥सरलार्थ - कर्जाचा शेष ( अल्पसाही भाग ), अग्नीचा दोष आणि त्याचप्रमाणे शत्रूचा शेष हे पुनः पुनः पुढे येतात म्हणून (या तिघांचा) शेष राखू नये. स्पष्टीकरण - एखाद्याचे कर्ज सगळेच्या सगळे फेडून टाकावे. शिल्लक राहिल्यास तेच वाढत जाते. आग समूळ विझवावी. एखादी ठिणगी जरी शिल्लक राहिली, तरी ती पुन्हा पेट घेते. शत्रू चालून आला तर त्याचा पुरता बीमोड करावा. त्याला अर्धवट सोडल्यास तो आज ना उद्या मोठा होऊन आपणास उपद्रव देऊ शकतो.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे



भारताचे स्वातंत्र्य चिरायू होवो !
पान ६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, १० ऑगस्ट २०२३



पुलांवरून पाणी जातंय
पान ७




बिलोली, कुंडलवाडी ते धानोरा मार्गे जाणारी एसटी बस पिंपळगाव शिवारात रस्त्याच्या कडेला उलटली. या अपघातात सुमारे चौदा प्रवासी जखमी झाले. सर्व जखमींना कुंडलवाडी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. छायाचित्र : बाबूराव गोणारकर

# मोदींसाठी मणिपूर हिंदुस्थान नाही

## राहुल गांधींचा मोदी सरकारवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** लोकसभेची खासदारकी परत मिळाल्यानंतर राहुल गांधींनी बुधवारी केलेल्या पहिल्याच भाषणात मोदी सरकारवर हल्लाबोल केला. मणिपूरच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षांनी नरेंद्र मोदी सरकारविरोधात अविश्वास प्रस्ताव आणला आहे. या प्रस्तावावर सध्या दोन्ही बाजूच्या सदस्यांकडून भाषणे चालू असून गुरुवारी १० ऑगस्ट रोजी त्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी उत्तर देणार असल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर आज राहुल गांधींनी केलेल्या भाषणात मोदी सरकारवर परखड शब्दांत टीका करण्यात आली. मोदी सरकारने मणिपूरमध्ये हिंदुस्थानची हत्या केली, असे राहुल गांधी आपल्या भाषणात म्हणाले. काही दिवसांपूर्वी मी मणिपूरला गेलो. आमचे पंतप्रधान आजपर्यंत गेले



नाहीत. कारण त्यांच्यासाठी मणिपूर हिंदुस्थान नाही. मी मणिपूर शब्दाचा वापर केला. पण आज मणिपूर वाचलेले नाही. मणिपूरला तुम्ही दोन भागांमध्ये वाटले आहे. मी मणिपूरच्या रिलीफ कॅम्पमध्ये गेलो. तिथे महिलांशी बोललो. मुलांशी बोललो. जे आपल्या पंतप्रधानांनी आजपर्यंत केले नाही. एका महिलेला मी विचारले, तुमच्याबरोबर काय झालं ? तर एक महिला म्हणाली, माझ्या डोळ्यांसमोर माझ्या मुलाला गोळी मारली गेली. मी रात्रभर त्याच्या प्रेताबरोबर झोपले होते, असं राहुल गांधी म्हणाले. राहुल गांधींच्या या विधानावर सत्ताधारी बाकांवरून हे खोटे आहे, असे म्हणताच मी खोटं बोलत नाही, तुम्ही खोटे बोलता असे म्हणत सत्ताधाऱ्यांना टोला लगावला. यांनी मणिपूरमध्य हिंदुस्थानची हत्या केली आहे. यांच्या राजकारणाने मणिपूरला नाही, हिंदुस्थानला मणिपूरमध्ये मारले आहे. हिंदुस्थानची हत्या केली आहे. यांनी मणिपूरमध्ये भारतमातेची हत्या केली. तुम्ही मणिपूरच्या लोकांना मारून हिंदुस्थानची हत्या केली. तुम्ही देशद्रोही आहात. त्यामुळेच तुमचे पंतप्रधान मणिपूरमध्ये जाऊ शकत नाहीत. कारण त्यांनी मणिपूरमध्ये भारत मातेची हत्या केली आहे. तुम्ही भारत मातेचे रक्षक नसून भारत मातेचे खूनी आहात, अशा आक्रमक शब्दांमध्ये राहुल गांधींनी हल्लाबोल केला.

# सुप्रसिद्ध लेखक, ज्येष्ठ विचारवंत हरी नरके यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** क्रांतीबा महात्मा फुले यांच्यावर विपुल लेखन करणारे, सुप्रसिद्ध लेखक प्रा. हरी नरके यांचे निधन झाले. ते ६० वर्षांचे होते. गेल्या अनेक दिवसांपासून ते आजारी होते. मुंबईतल्या एशियन हार्ट रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ओबीसींच्या प्रश्नांवर त्यांचा मोठा अभ्यास होता. समता परिषदेच्या माध्यमातून त्यांनी ओबीसी प्रश्नांवरून सत्ताधाऱ्यांना अनेकदा धारेवर धरलं होतं. त्यांच्या निधनाने पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली आहे. पुणे विद्यापीठातील महात्मा फुले अध्यासनाचे अध्यासन प्राध्यापक म्हणून त्यांनी काम पाहिले. महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य म्हणूनही त्यांचं उल्लेखनीय काम राहिले.

पुण्यातील आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या भांडारकर प्राच्यविद्या संस्थेवरही त्यांचे विशेष राहिले. मराठी भाषा ही संस्कृत, कन्नड, तेलुगू यांप्रमाणेच एक अभिजात भारतीय भाषा आहे हे सिद्ध करण्यासाठी नेमलेल्या रंगनाथ पठारे समितीच्या अहवालात प्रमुख समन्वयक म्हणून प्रा. हरी नरके यांनी योगदान दिले आहे.

महाराष्ट्र शासनाने 'समग्र महात्मा फुले' नावाचा एक हजार पानाचा ग्रंथ अद्ययावत करून प्रकाशित केला. त्याचे हरी नरके संपादक होते. डॉ आंबेडकरांच्या समग्र वाङ्मयाचे राज्य शासनाने २६ खंड प्रकाशित केले, त्यातील सहा खंडांचे संपादन हरी नरके यांनी केले होते. महात्मा फुले यांची बदनामी : एक सत्यशोधन आणि महात्मा फुले- शोधाच्या नव्या वाटा ही दोन पुस्तके त्यांची लोकप्रिय होती. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्री बाई फुले यांच्याविषयी हरी नरके यांनी समग्र लिखाण केले. महात्मा फुले साहित्याचा अभ्यास आणि संशोधन करणारे संशोधक म्हणून ते उभ्या महाराष्ट्राला सुपरिचित होते.

# जि.प. केंद्रीय कन्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेतली क्षेत्रभेट

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** शालेय जीवनात विद्यार्थी अनेक गोष्टी ह्या निसर्गाकडून शिकत असतात याचाच एक भाग म्हणून आज जि.प. केंद्रिय कन्या शाळा चारठाणाच्या विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रभेट उपक्रम आयोजित करण्यात आला. आज कन्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी चारठाणा नगरीतील विविध ऐतिहासिक वास्तुंना भेट देऊन क्षेत्रभेट अनुभव व आनंद घेतला सर्वप्रथम विद्यार्थ्यांनी गोकुळेश्वर महादेव मंदिर व परीसारातील बारव ला भेट देऊन माहिती घेतली त्यानंतर, काशिविश्वेश्वर मंदिर व गणेश मंदिर, तसेच ऐतिहासिक दीपस्तंभ ला भेट देऊन माहिती संकलित केली. त्यानंतर नदीकाठी वसलेल्या हेमाडपंथी मंदिर येथे वनभोजन केले. तदनंतर थोडी विश्रांती घेऊन सावता मंदिर येथील सभागृहात विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम



घेण्यात आला. वर्ग चौथी ते सातवीच्या मुलांनी, मुलींनी भाग घेतला. विशेष आकर्षण म्हणजे ज्येष्ठ शिक्षक नारायण गडदे यांनी गीत गायन केले. शेवटी शाळेत जाऊन समारोप करण्यात आला. नारायण गडदे, ज्ञानेश्वर ननुरे, प्रशांत चौधरी, रामराव देशमुख, श्रीमती इंदू उलिगडे, सरस्वती फोले , संगीता केंद्रे,विद्युलत्ता कुलकर्णी यांनी सहभाग घेतला एकंदरीत आज विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष क्षेत्रभेटीच्या माध्यमातुन माहिती मिळवली व आजच्या भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

आदरांजली...

# महाराष्ट्राचे विद्यापीठ काळाच्या पडद्याआड

आधुनिक केसरी



**जेष्ठ विचारवंत, महाराष्ट्रात वैचारिक प्रबोधन करून समाजजागृती करणारे अनोखे व्यक्तिमत्व म्हणून प्रा. हरी नरके यांनी पुरोगामी महाराष्ट्रावर आपली अनोखी छाप निर्माण केली. ते महाराष्ट्राचे चालते बोलते विद्यापीठ म्हणून काळाच्या पडद्याआड गेल्याने महाराष्ट्राचे वैचारिक नुकसान झाले, अशा प्रतिक्रिया मान्यवरांकडून व्यक्त झाल्या.**

**पुरोगामी विचारांचे विचारवाहक :** प्रा.हरी नरके यांचे आज निधन झाल्याची बातमी मला कळली आणि मनातील काळजाचा एक कोपरा कुठेतरी हळहळला. खरं तर सरांचे अवघ्या सत्तराव्या वर्षी देहरुपाने सोडून जाणे ही बाबच कुणालाही न पटणारी आहे. या देशाला पुरोगामी विचारांची एक फार मोठी परंपरा आहे. फुले-शाहू-आंबेडकरांचा एक मोठा विचार आणि वारसा जोपासणारे प्रा. हरी नरके एक मोलाचे लेखक,संपादक, विचारवंत आणि व्याख्याते होते यात शंकाच नाही. त्यांचा अभ्यास आणि विचारसरणी ही परिवर्तनवादी प्रवाहाशी एकनिष्ठता बाळगणारी होती. अतिशय प्रसन्नमुख व्यक्तिमत्त्व,सखोल वाचन आणि चिंतन असल्यामुळे ते विषयाला सहजरित्या न्याय देऊ शकतात याची मला जाणीव झाली.आजपर्यंत त्यांची पुस्तकेच आम्ही वाचली होती परंतु या व्याख्यानाच्या निमित्ताने संवाद साधण्याचा योग्य आला. प्रा.हरी नरके सरांसारखा पुरोगामी विचारांचा एक सच्चा पाईक हंरवल्याची खंत आज केवळ मलाच नाही तर माझ्यासारख्या अनेकांच्या मनात कायमची सल ठेऊन जाणारी आहे. **- प्रा. डॉ. अनंता सूर, वणी, यवतमाळ**

**विचारवंत शोभावा असा माणूस :** प्रा. हरी नरके यांच्या निधनाची बातमी अत्यंत धक्कादायक आहे. काल-परवापर्यंत सोशल मीडियावर सक्रिय असणाऱ्या नरकेसरांचे असे जाणे अनपेक्षित आणि खूप दुःखद आहे. खऱ्या अर्थाने 'विचारवंत' शोभावा असा हा माणूस होता. महात्मा फुले यांच्या साहित्याकडे आणि कार्याकडे बघण्याची नवी दृष्टी या माणसाने महाराष्ट्राला दिलीच, पण मराठी भाषेला 'अभिजात दर्जा' मिळावा म्हणून त्यांनी केलेले संशोधन- लेखन आणि पाठपुरावा या सगळ्याच गोष्टी त्यांच्या अफाट व्यासंगाची साक्ष देणाऱ्या आहेत. त्यांचे लेखन वेगळ्या धाटणीचे आणि परंपरेला छेद देणारे आहे. त्यांची युट्युबवरील भाषणे आणि मुलाखती जरी आपण ऐकल्या तरी त्यांची भूमिका काय होती ? हे आपल्या लक्षात येईल.आजवर महाराष्ट्रभरात त्यांनी विविध विषयावर हजारो व्याख्याने दिली असतील. एकदा का हा माणूस बोलायला उभा राहिला की, दोन अडीच तास अखंड बोलत असे. हे बोलणे अत्यंत प्रवाही, सप्रमाण आणि सडेतोड असे. त्यांना ऐकणे म्हणजे समृद्ध होण्यासारखे होते. हा अनुभव मी अनेकदा घेतलाय. त्यांची राजकीय भूमिकादेखील अत्यंत पक्की होती. कुणाचाही मुलाहिजा ते बाळगत नव्हते. **पी. विठ्ठल, नांदेड**

**फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीचा भाष्यकार :** 'सोबत'च्या अंकामध्ये डॉ. बाळ गांगल यांचा एक लेख प्रसिद्ध झाला. हा कसला महात्मा- फुले म्हणवणारी ही दुर्गंधी... यामुळे संबंध महाराष्ट्रात खळबळ माजली. फुल्यांना दुर्गंधी म्हणणारे बाळ गांगल यांना उत्तर देणे अपेक्षित होते. यानिमित्ताने आंदोलने झाली, निषेध करण्यात आला. विधिमंडळाने लेख छापल्याबद्दल ग.वा.बेहेरे यांना शिक्षा दिली. पुढे 'सोबत' बंद पडला. परंतु नेमकेपणाने या प्रवृत्तींना उत्तर देणे अपेक्षित होते. हे उत्तर प्रथमतः प्रा. हरी नरके यांनी दिले. नरकेंचा म. फुले एक सत्यशोधन या नावाचा छोटा ग्रंथ बाजारात आला. यात फार मुद्देसूद मत व्यक्त करून त्या ग्रंथातून गांगलांचे सर्व मुद्दे खोडून काढले. फुल्यांचे महत्व पुन्हा एकदा महाराष्ट्राला समजावून सांगितले. हा ग्रंथ जेव्हा शरद पवारांच्या वाचनात आला तेव्हा टेलकोमध्ये काम करणारे हरी नरके यांना बोलावून घेतले.,चौकशी केली आणि टेलकोच्या व्यवस्थापकांना सांगितले की यांचा पगार घ्या आणि यापुढे हरी नरके संशोधन करतील. आणि तेथून पूढे ते संशोधक बनले. **- प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे, अंबाजोगाई.**

**पुरोगामी चळवळीचे वैचारिक मार्गदर्शक :** जेष्ठ पुरोगामी विचारवंत तसेच सामाजिक,शैक्षणिक,वैचारिक क्षेत्रातील बहुश्रुत असणारं व्यक्तिमत्वं म्हणून प्रा. डॉ. हरी नरके यांच्याकडे पाहिले जायचे. फुले,शाहू,आंबेडकरी समतेच्या चळवळीचे ते प्रभावी मार्गदर्शक आणि वैचारिक दिशादर्शकही होते. फुले,शाहू,आंबेडकरांचा विचार अगदी निडरपणे त्यांनी लोकांसमोर मांडला. कुणाचीही तमा न बाळगता सत्य ते मांडायचे. महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनातील अनेक सत्य शोधून त्यांनी वाचकांना ग्रंथरूपाने दिले आहे. महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. पुरोगामी विचार त्यांनी आपल्या लेखणीतून आणि वाणीतून सतत वाचकाला दिला. त्या लेखनातून अनेकांना प्रेरणा मिळाली. विशेषतः त्यांच्या विचाराने अनेक तरुणांना प्रेरणा, प्रोत्साहन मिळत असे. विविध क्षेत्रात, सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग नोंदवून अनेक तरूण कार्य करत होते. खरे तर ते अनेकांचे वैचारिक मार्गदर्शक होते. त्यांच्या या वैचारिक मार्गदर्शनाने अनेकांना आपल्या जीवनाची दिशा सापडत असे. त्यांच्या लेखनाने आणि वाणीने अनेकांच्या मानसिकतेत बदल म्हणजे परिवर्तन होत असे. **- प्रा.डॉ.सतीश मस्के, पिंपळनेर, ता.साक्री, जि.धुळे**

**विचारवंत आणि कार्यकर्ता :** 2006 साली पुणे विद्यापीठाने व तेथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सामाजिक न्याय' या विषयावर उद्बोधन वर्ग आयोजित केला होता. तेव्हा तिथे प्रा. हरी नरके यांच्या अभ्यासपूर्ण विचारांचा स्पर्श झाला. आणि हे व्यक्तिमत्त्व सतत भावत गेले. त्यांचा अभ्यास, चिंतन बोध घेणारे होते. फुले,शाहू, आंबेडकरांच्या विचारांची अभ्यासपूर्ण चिकित्सा करणारे प्रा.हरी नरके साऱ्या महाराष्ट्राला परिचित होते. प्रा.नरके सर विचारवंत म्हणून प्रसिद्ध होते असे नाही तर कार्यकर्ता म्हणून विरोधी विचारांचा प्रतिवाद अभ्यासपूर्ण व सडेतोडपणे करत असत. त्यांच्या निधनाने फुले,शाहू,आंबेडकरी चळवळीचे तसेच वंचित, दलित व इतर मागासवर्गीय समाजाचे न भरणारे नुकसान झाले आहे.

**- प्रा. एम.व्ही.बळसाने, पिंपळनेर(धुळे)**

**संकलन: बाळासाहेब जोगदंड**

# स्मृती इराणींची आगपाखड

आधुनिक केसरी

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची खासदारकी परत मिळाली असून ते आज लोकसभेतही परतले आहेत. त्यांच्या पहिल्याच भाषणात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर शाब्दिक प्रहार केले. मी आज अदानी विषयावर बोलणार नाही, असे सांगत त्यांनी मणिपूरप्रश्नी केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली. दरम्यान, सभागृहात लांबलचक भाषण करून झाल्यावर राहुल गांधींनी सभागृह सोडले. यावेळी त्यांनी केलेल्या एका कृतीवर केंद्रीय मंत्री स्मृती इराणी प्रचंड संतापल्या असून राहुल गांधींना त्यांनी स्त्रीद्वेष्टा संबोधले आहे. अविश्वास प्रस्तावावर भाषण दिल्यानंतर राहुल गांधी यांनी लोकसभा सभागृह सोडले. यावेळी राहुल गांधी यांच्या हातून काही फायली पडल्या. या फायली उचलण्याकरता राहुल गांधी खाली वाकले, तेव्हा भाजपाचे काही खासदार त्यांच्यावर हसले, असे इंडिया टुडेने म्हटले आहे. भाजपा खासदारांच्या या कृतीला प्रत्युत्तर म्हणून राहुल गांधींनी या खासदारांना फ्लाइंग किस दिले. हा प्रकार कॅमेऱ्यात कैद झाला नसला तरीही काही साक्षीदारांच्या म्हणण्यानुसार इंडिया टुडेने हे वृत्त दिले आहे. दरम्यान, यावरून केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री स्मृती इराणी यांनी संताप व्यक्त केला. राहुल गांधी यांनी जाता जाता अभद्र कृतीचे दर्शन घडवले. फक्त एक स्त्रीद्वेष्टा पुरुषच संसदेत महिला खासदारांना फाइंग किस देऊ शकतो. अशा प्रकारची कृती लोकसभेत कधीच घडली नव्हती. हे त्यांच्या कुटुंबाचे संस्कार आहेत हे आज देशाला माहित पडले. ते काय विचार करतात हे या कृतीतून दिसून आले आहे, असे स्मृती इराणी म्हणाल्या. राहुल गांधी यांनी मांडलेल्या अविश्वास प्रस्तवाच्या भाषणाला उत्तर देताना स्मृती इराणी यांनी ही प्रतिक्रिया दिली. स्मृती इराणी यांनी लोकसभेच्या बाहेरही प्रसिद्धी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. राहुल गांधी यांनी आज संसेदत जे काही केले त्यासारखे वाईट वर्तन याआधी कधीच झाले नव्हते. लोकसभेत महिलांच्या प्रतिष्ठेच्या रक्षणासाठी कायदे केले जातात, परंतु, येथे लोकसभेतील सत्रादरम्यान राहुल गांधी यांच्याकडून दष्कृत्य केले गेले. त्यांना परत लोकसभेत आणले पाहिजे का? असा माझा प्रश्न आहे. जे लोक कायद्याचे उल्लंघन करतात, वाईट इशारे करतात. हे माहित नव्हते की गांधी कुटुंबात असेही संस्कार आहेत, अशी टीका त्यांनी प्रसिद्धी माध्यमांसमोर केली.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# वाढते प्रदूषण, घटते आयुष्य

आधुनिक केसरी

**वायू प्रदूषणामुळे अनेक नवीन आजार आणि इतर समस्या निर्माण होत असतानाच त्याचा परिणाम वयावरही होत आहे.अमेरिकन संशोधकांच्या मते, वाढत्या वायू प्रदूषणामुळे भारतीयांचे वय नऊ वर्षांनी कमी होत आहे. शिकागो विद्यापीठाच्या 'द एनर्जी पॉलिसी इन्स्टिट्यूट'नुसार, भारतातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. जगभरातील प्रदूषित शहरांच्या क्रमवारीत भारतीय शहरांची संख्या गेल्या काही वर्षांत वाढली आहे. अहवालानुसार, उत्तर भारतातील प्रदूषणाची पातळी जगातील इतर शहरांच्या तुलनेत दहापट जास्त धोकादायक आहे. याची अनेक कारणे आहेत. वीटभट्ट्या, वाढती पेट्रोलियम वाहने, कारखाने, शेतातला कचरा जाळणे आणि इतर अनेक लहान घटक यात समाविष्ट आहेत.**

या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, गेल्या दशकात पश्चिम आणि मध्य भारतातील महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशपर्यंत वायू प्रदूषणात वाढ झाली आहे. त्यामुळे या राज्यांतील लोकांचे सरासरी वय तीन वर्षांनी कमी झाले आहे.

वायुप्रदूषणाच्या बाबतीत भारतीय शहरांमध्ये दिल्ली पहिल्या क्रमांकावर आहे. येथील वायूप्रदूषण कमी करण्यासाठी दिल्ली सरकारचे प्रयत्न तितकेसे प्रभावी ठरलेले नाहीत, ज्यामुळे नागरिकांना प्रदूषणापासून दिलासा मिळेल. 'द एनर्जी पॉलिसी इन्स्टिट्यूट'ने जारी केलेल्या एअर क्वालिटी इंडेक्सच्या अहवालानुसार, दिल्लीतील लोकांचे सरासरी आयुष्य दहा वर्षांनी वाढवायचे असेल, तर जागतिक आरोग्य संघटनेच्या सूचनांची तातडीने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यानुसार, भारतातील शहरांमधील वार्षिक हवेत पीएम (PM) 2.5 कण (हेच सूक्ष्म कण जे प्रदूषण करतात) जगातील इतर शहरांच्या तुलनेत उच्च पातळीवर आहेत. विशेष म्हणजे, जगातील पन्नास सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी पस्तीस शहरे भारतातील आहेत. 'एनव्हायर्नमेंटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी' या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अलीकडील अहवालात या देशांमध्ये पीएम 2.5 च्या उच्च एकाग्रतेचे मुख्य चालक म्हणून प्राथमिक सेंद्रिय-विविध स्त्रोतांकडून थेट वातावरणात उत्सर्जित होणारे कार्बन कण ओळखले जातात.

पीएम 2.5 हे श्वासोच्छ्वास करण्यायोग्य सूक्ष्म कण आहेत, सामान्यतः 2.5 मायक्रोमीटर किंवा व्यासाने लहान. या अभ्यासातून असे दिसून आले आहे की 2019 मध्ये एम्बियंट पीएम 2.5 ने दक्षिण आशियामध्ये 10 लाखांहून अधिक मृत्यू, मुख्यत्वे घरे, उद्योग आणि वीज निर्मितीमध्ये इंधन जाळल्यामुळे झाले. या अभ्यासात असे आढळून आले आहे की पीएम 2.5 मुळे होणाऱ्या मृत्यूमध्ये घन जैवइंधनाचा मोठा वाटा आहे, त्यानंतर कोळसा, तेल आणि वायूचा क्रमांक लागतो.आणखी एका संशोधनात वाढत्या वायू प्रदूषणासाठी अशी कारणेही देण्यात आली आहेत, जी अत्यंत धोकादायक आहेत. या घटकांमध्ये पॉवर प्लांटमधील सल्फर आणि नायट्रोजन



ऑक्साईड, डिझेल जळणे आणि जीवाश्म इंधन उत्सर्जन यांचा समावेश होतो, ज्यांना नियंत्रणात आणणे आवश्यक आहे. उत्सर्जनावर गेल्या दोन दशकांत अकरा संशोधने झाली आहेत. हे संशोधन लंडन, न्यूयॉर्क आणि बीजिंगमध्ये झाले. त्यांच्या अहवालानुसार, वायुप्रदूषणाच्या कारणांमध्ये रासायनिक उत्पादने, घरातील रंग आणि कोळसा जाळणे यांचा समावेश आहे.

मेटल ऑरगॅनिक फ्रेमवर्क एमओएफ नावाची सामग्री इंग्लंडच्या 'द युनिव्हर्सिटी ऑफ मँचेस्टर'च्या नेतृत्वाखाली विकसित करण्यात आली आहे. त्यात नायट्रोजन डायऑक्साइड एनओ2 (NO2) शोषण्याची क्षमता आहे.एनओ2 ची निर्मिती विशेषतः डिझेल आणि जैव-इंधन जळण्यापासून होते, जो एक विषारी आणि प्रदूषक वायू आहे.एनओ2 सहजपणे नायट्रिकमध्ये रूपांतरित केले जाऊ शकते, जे पिकांसाठी कृषी खत म्हणून वापरले जाते. नायट्रिक ऍसिड खूप उपयुक्त आहे. रॉकेटचे इंधन आणि नायलॉनसारखे साहित्यही त्यातून बनवता येते. आणखी एका संशोधनाद्वारे वायू प्रदूषण कमी करण्यात यश मिळण्याची आशा आहे. ओक रिज नॅशनल लॅबोरेटरी आणि बर्कले नॅशनल लॅबोरेटरी येथील संशोधकांनी मेटल ऑरगॅनिक फ्रेमवर्क (एमओएफ) ची चाचणी केली. संशोधकांच्या टीमने एमएफएम-520 मधील एनओ2 शोषणाच्या यंत्रणेचा अभ्यास करण्यासाठी मँचेस्टरमधील लेक्ट्रॉन पॅरामॅग्नेटिक रेझोनेटेड स्पेक्ट्रोस्कोपीसाठी सरकारी सेवा वापरली.

या तंत्राने वायू प्रदूषण नियंत्रित करता येते. त्यामुळे पर्यावरणावरील नायट्रोजनचे वाईट परिणाम टाळता येतील.हा नवा प्रयोग पूर्णपणे यशस्वी झाला तर वायू प्रदूषणाच्या समस्येतून बऱ्याच अंशी सुटका होऊ शकते. वातावरणातील हरितगृह आणि विषारी वायू शोषून घेताना ते उपयुक्त, मौल्यवान उत्पादनांमध्ये रूपांतरित केले जाऊ शकतात. शास्त्रज्ञांच्या मते, सामान्य माणूस पुढे आला तर वायू प्रदूषणाशिवाय ध्वनी, माती, प्रकाश, जल आणि अग्नि प्रदूषणापासून मुक्ती मिळू शकते. यासाठी शक्यतो सार्वजनिक वाहतूक वापरण्याची सवय लावणे आवश्यक आहे.दिल्लीपेक्षा मुंबईत कमी वायू प्रदूषण होण्यामागचे एक कारण म्हणजे तेथील सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर. याचा काहीसा परिणाम दिल्लीत ई-बससारख्या नवीन तंत्रज्ञानामुळे दिसून येईल. विशेष म्हणजे खाजगी वाहनांच्या अतिवापरामुळे वातावरणातील कार्बन मोनॉक्साईडचे प्रमाण खूप वाढते.

भारतातील वायू प्रदूषण वाढण्याचे आणि परदेशातून पेट्रोलियम पदार्थ आयात करण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे पेट्रोलियम वाहनांचा वापर. ई-वाहनांचा वापर केल्यास वायू प्रदूषणापासून सुटका होईलच, शिवाय पेट्रोलियम पदार्थांच्या आयातीवर होणारा खर्चही वाचेल.पर्यावरणाच्या रक्षणासाठी उपयुक्त अशी जीवनशैली अंगीकारण्याची गरज आहे. यामुळे आजार टाळण्यास मदत होईल, तर नैसर्गिक जीवन जगण्याची सवयही लागेल. असा सल्ला शास्त्रज्ञांसोबतच डॉक्टरही देत आहेत. ऑक्सिजनची कमतरता झाडे लावून, बाग तयार करून दूर करता येते.त्यामुळे आजूबाजूला हिरवळ वाढेल, तर फळे, सुका मेवा, लाकूड यांचेही आवश्यकतेनुसार उत्पादन होईल. शास्त्रज्ञांच्या मते, विजेचा वापर कमी करून ऊर्जा अधिक चांगल्या प्रकारे वाचवता येते आणि इलेक्ट्रिक बल्ब आणि इतर उत्पादनांमुळे निर्माण होणारी उष्णता देखील टाळता येते.

सामान्य माणूस दैनंदिन जीवनात गरजेपेक्षा जास्त प्लास्टिक वापरतो. चांगले पर्याय उपलब्ध असूनही आपण सवयीमुळे प्लास्टिक पिशव्या वापरत राहतो. विशेष म्हणजे प्लॅस्टिक पिशव्या हे वायू प्रदूषण वाढवण्याचे प्रमुख कारण आहे. या पिशव्या नदी, नाले आणि समुद्रात पोहोचतात आणि त्यात राहणाऱ्या प्राण्यांच्या मृत्यूचे कारण बनतात. म्हणूनच प्लॅस्टिक पिशव्यांपासून मुक्त होणे महत्त्वाचे आहे. आणि सौरऊर्जेचा वापर करून आपण वायू प्रदूषणाची समस्या बऱ्याच अंशी कमी करू शकतो. घरांमध्ये सोलर पॅनल बसवणे हा विजेला चांगला पर्याय आहे. वायू प्रदूषण कमी करण्यात आपली भूमिका खूप महत्त्वाची आहे. आपण बाजारातून अशाच वस्तू खरेदी कराव्यात, ज्या पुन्हा पुन्हा वापरता येतील. त्याचप्रमाणे वायू प्रदूषण वाढण्यास धूम्रपान कारणीभूत आहे.जर आपण विडी, सिगारेट आणि इतर तंबाखूजन्य पदार्थांचा वापर केला नाही तर हवेचे प्रदूषण कमी करण्यात आपली मदत होऊ शकते. सर्वात प्रभावी उपाय म्हणजे स्वतः जागरूक राहणे आणि इतरांनाही जागरूक करणे. त्यामुळे वायू प्रदूषणाचा प्रश्न लवकरच सुटू शकेल.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# सत्य स्वीकारलं तर मन आपोआप हलकं होतं

आधुनिक केसरी

**जीवनातील सुख दुःख निर्मितीच मुख्य केंद्रबिंदू हा मनावी मन आहे.आपल मन आपल्या साई नुसार सत्य असत्य ठरवत पण वास्तविक सत्य काय आहे ते समजलं आणि आपल्या मनाने ते सत्य स्वीकारलं तर मन हलकं होऊन दुःखां चा प्रभाव तात्काळ संपुष्टात येतो .सुख सगळ्यांना हवं असत .पण दुःख कोणालाही नको आहे . नको म्हटलं म्हणून दुःख संपणार नाही अथवा आपल्या जीवनातील दुःखां चा प्रभाव कमी होणार नाही. दुःख संपुष्टात येण्यासाठी अथवा त्याचा प्रभाव कमी होण्यासाठी जीवनात सत्य स्वीकारता आल पाहिजे. जीवन हे क्षणभंगुर आहे हे महित असताना देखील आपण अनंत अपेक्षांचं ओझ घेउन जीवन जगतोय.**

हा अपेक्षांचा लपंडाव आणि अज्ञान यामुळे जीवनात आपल्याला दुःखाची जाणीव होते. दुःखांचा भवसिंधु तरूण जाण्यासाठी सत्याची कास धरून सत्य स्वीकारता आलं पाहिजे. दैनंदिन संसारातील अनेक छोट्या मोठ्या दुःखाचा प्रभाव नष्ट करण्यासाठी आपल्याला आपल्या जीवनात वास्तव आणि सत्य याचा योग्य पद्धतीने ताळमेळ घालता आला पाहिजे. परस्थिती बदलता येत नाही पण ती योग्य पद्धतीने स्वीकारून मार्गक्रमण करता येत. शरिर नश्वर असुन आत्मा अमर आहे .या सृष्टीवर आपण पाहुणे आहेत. आपण सोबत काही आणलेलं नाही अथवा कर्माचा चांगला वाईट प्रभाव सोडला तर नगदी स्वरूपात धन, द्रव्य,दारा, पैसा , वगैरे, वगैरे असं काही घेऊन जाणार नाहीत. अंत समयी फक्त काळ हाच आपला सख्खा सोयरा आहे बाकी सगळे नातेवाईक शरीराचे होते .शरीर संपल नाते संपले हे सुर्य प्रकाशा एवढं स्वच्छ आहे .मग आपल्याला शाश्वत काय आहे आणि भौतिक काय आहे या मधील अंतर समजलं पाहिजे. भौतिक मिथ्य आहे तर मग भौतिक मधुन निर्माण होणार दुःख सुद्धा मिथ्य आहे .आपल्या जीवनात निर्माण होणार दुःख हे आपण सत्याचा सामाना करायला घाबरतो म्हणून ओढावत आहे. सत्य स्वीकारता आलं तर सृष्टी वर दुःख अस्तित्वात नाहीच.आपण आपल्या इच्छेनुसार आपल्या मनात जग निर्माण करतो. आणि हेच आपल्या मनातील जग सत्यत उतरतं नाही हे सत्य पाचवता येत नाही म्हणून दुःखाची निर्मीत आणि मालिका सुरू होते .जगातील सगळ्यात कठीण गोष्ट म्हणजे सत्य स्वीकारणं सत्य स्वीकारणं जमलं कि मग असत्य आणि दुःख आपला मागोवा आपोआप सोडतात. परंतु आपल्या मनाने काय स्वीकारायचं आणि काय नाही स्वीकारायचं हे आपल्यावर अवलंबून असतं .परंतु जे आपल्या कडे वर्तमान परिस्थितीत उपलब्ध आहे त्यामध्ये समाधान आनंद मानने म्हणजे सत्य स्वीकारणं होय इच्छा अनंत आहेत अपेक्षा अनंत आहेत पण वास्तवाचं भान असण हे सत्य आहेआणि सत्य स्वीकारता आलं पाहिजे आपल्याकडे जे उपलब्ध साधन आहेत त्या मध्ये समाधान मानण्याची वृत्ती निर्माण झाली पाहिजे .मग कितीही मोठी घटना घडामोड आपल्या वर काहीही परिणाम करू शकत नाही. अनेकदा आपल्या मनाला काही वेगळं अपेक्षित असतं आणि उपलब्ध वेगळं असतं मग या मध्ये सुद्धा संतुलन निर्माण करुन आपल्याला योग्य पद्धतीने आपल्या मनाला स्थिरावता आलं पाहिजे .मनाची समजूत घालता आली पाहिजे .सत्य समजवता आलं कि मग मात्र मन दुःख मुक्त होत जीवन हे क्षणभंगुर आहे तरी सुद्धा अपेक्षा इच्छा ह्या अनंत असतात . बहुतांश अपेक्षा पुर्ण होतात तर काही अपेक्षा अपुऱ्या राहतात . आणि जीवनाच्या रंगमंचावर अपेक्षांचा लंपडाव चालू असतो. मग या मधुनच सुख दुःखांची निर्मिती होते. परंतु या सगळ्या मध्ये महत्वाची गोष्ट हि आहे जे उपलब्ध आहे त्या मध्ये समाधान मानण्याची वृत्ती जर निर्माण झाली तर दुःख मुक्त होण्यापासून आपल्यला कोणतीही शक्ती रोखु शकत नाही.कितीही आणि काहीही मिळाल तरी मानवी मन हे असं विचित्र आहे कि ते आपल्याला जे मिळालं त्याबद्दल कधीच समाधानी राहु देत नाही कारण मानवी मन हे अंत्यत चंचल असतं. आणि ते आपलं हितकारक पण असतं आणि अहितकारक सुद्धा असत. म्हणजे एकंदरीत मानवी मन हे आपल्या सुख दुःखच मुळ असतं त्यामुळे मनाला संभाळन हे आपलं खुप मोठ कौशल्य असत. शेवटी आपल्या सोबत काय आहे काय नाही, आपण काय कमावले काय आहे काय गमावले हे फार महत्त्वाचे नाही कारण निसर्गाच्या नियमानुसार आपल्यला अखत्यारी मध्ये कुठलिही गोष्ट नाही .मग तरी सुद्धा आपण जीवनात घडणाऱ्या वेगवेगळ्या घटनाक्रम च्या अनुषंगाने दुःख व्यक्त करतोय . हे कितपत योग्य आहे . सगळ्या बाबी आपल्या मनाला महित असताना सुद्धा आपण जे वास्तविक आणि अंतिम सत्य आपल्याला माहित असताना देखिल आपण ते आपल्या मनाला ते आपण समाजु शकत नाहीत हिच बाबा खुप आश्चर्य कारक आहे . सत्य माहित असताना ते मनाला समजवता न येण हेच खुप अवघड आहे . आणि त्यामुळेच सर्वकाही मिळुन सुद्धा आपण वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने आपण दुःखी होतोच मग त्यासाठी प्रभावी उपाय हाच आहे कि जे आपल्याकडे उपलब्ध आहे त्या मध्ये समाधान मानण्याची वृत्ती निर्माण झाली अथवा हि कला ज्यांना अवगत झाली आहे त्यांना कुठल्याही दुःखाची तीव्रता काहीही परिणाम करू शकत नाही . आणि मनाला सत्य समजवण्याचा सामर्थ्य हे फक्त अध्यात्मिक ज्ञाना मध्ये आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# सुधीर मुनगंटीवारांमुळे कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य

## मनपातील ३३ कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपुर :** पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे आज ३३ कुटुंबांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले. बरेच दिवसांपासून रखडलेल्या विषयाचा पाठपुरावा करून सुधीर मुनगंटीवार यांनी आरोग्य विभागातील समावेशनाचा प्रश्न मार्गी लावला आणि ३३ कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. चंद्रपूर महानगरपालिकेत आरोग्य विभागाच्या आस्थापनेवर अधिसंख्य पदे निर्माण करून ४ वैद्यकीय अधिकारी व ३३ कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्यासाठी वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला.

ना.मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्याला यश प्राप्त झाले आणि समावेशन करण्यास शासनाने मंजुरी दिली. त्यानुसार मनपाच्या आस्थापनेवर समावेशन झालेल्या ३३ आरोग्य कर्मचाऱ्यांना पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. सर्व कर्मचाऱ्यांनी पालकमंत्र्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करत आभार मानले.

चंद्रपूर शहर महानगर पालिकेतील आरोग्य विभागात प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम फेज -२ अंतर्गत सन २००६-०७ पासून ३७ कर्मचारी (४ वैद्यकीय अधिकारी व ३३ कर्मचारी) मानधन तत्वावर आरोग्य सेवा देत आहेत. मनपा आरोग्य विभाग मुख्यालय तसेच शहरातील ७ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रात, गत १५ वर्षांपासून सदर कर्मचारी कार्यरत आहेत. कोविड – १९ कोरोना महामारीच्या काळातसुध्दा या कर्मचा-यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा प्रदान केली. राज्यातील इतर महानगर पालिकेत प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम फेज -२ मधील अधिकारी / कर्मचा-यांना मनपाच्या सेवेत सामावून घेण्यात आले होते. ही बाब आरोग्य कर्मचा-यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यामुळे शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार चंद्रपूर मनपाच्या आस्थापनेवर आरोग्य कर्मचा-यांचे समावेशन करण्यासाठी श्री. मुनगंटीवार यांनी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला. त्यानुसार चंद्रपूर मनपाच्या आस्थापनेवर ३७ कर्मचा-यांचे समावेशन करण्यासंदर्भात १६ जून २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. अधिसंख्य पदे निर्माण करून अखेर सोमवारी (दि.७) पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते 33 आरोग्य कर्मचा-यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. उर्वरीत ४ वैद्यकीय अधिका-यांना सेवाप्रवेश नियम मंजूर झाल्यानंतर त्यांचे समावेशन करण्यात येणार आहे.चंद्रपूर महानगरपालिकेतील राष्ट्रीय प्रजनन व बाल संगोपन आरोग्य कार्यक्रम फेज -२ या कार्यक्रमांतर्गत मानधन तत्त्वावर कार्यरत असलेले व्यवस्थापक - १ पद, पी.एच.एन - २ पदे, ए.एन.एम - २२ पदे, अकाउंटंट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर - १ पद, लिपिक कम डाटा एन्ट्री ऑपरेटर -४ व शिपाई - ३ पदे अशा एकूण ३३ कर्मचाऱ्यांसाठी महानगरपालिका स्तरावर अधिसंख्य पदे निर्माण करून त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी मुनगंटीवार यांनी मनपाच्या आस्थापनेवर समावेशन झालेल्या सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांचे अभिनंदन केले. तसेच सर्वसामान्य नागरिकांना चांगली आणि वेळेवर आरोग्य सेवा देण्यासाठी कर्मचा-यांनी नेहमी कार्यतत्पर राहावे. तुमच्या चेह-यावरचे हास्य हे उपचाराअंती रुग्णांच्या चेह-यावरसुध्दा दिसले पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# ठिबक व तुषार सिंचन संचाचे थकित अनुदान वितरित : नानासाहेब राऊत

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** कृषी विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या कृषी संजीवनी योजनेअंतर्गत ठिबक व तुषार सिंचन संचाचे थकीत अनुदान कृषी विभागाने त्वरित वितरित करावेत अन्यथा परभणी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा एका निवेदना व्दारे परभणी जिल्हा काँग्रेस कमिटी कार्याध्यक्ष नानासाहेब राऊत यांनी जिल्हा कृषी अधिकारी कृषी कार्यालय परभणी यांना दिला आहे.

बाबत अधिक माहिती अशी की, या वर्षी दुबार पेरणी सह वरुन राजाने दडी मारल्याने शेतकऱ्यावर दुष्काळाचे संकट ओढवले असतांना कृषी विभागामार्फत कृषी संजीवनी योजनेअंतर्गत चारठाणा व परिसरातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचन व तुषार सिंचन संच घेण्या बाबत पूर्वसंमती मिळालेली असून शेतकऱ्यांनी सात आठ महिन्यापूर्वी हे संच खरेदी केले आहेत त्याचे बिले सुध्दा ऑनलाइन प्रणाली द्वारे कृषी कार्यालयास सादर केले असून अद्याप पर्यंत या शेतकऱ्यांना सदर अनुदान मिळालेले नाही परंतु दुबार पेरणी व वरून राजाने मारलेल्या दडीमुळे शेतकऱ्यावर दुष्काळाचे संकट ओढवलेले असतांना आता उपासमारीची वेळ आली आहे अशात कृषी विभागाने वितरित केलेल्या ठिबक सिंचन व तुषार सिंचनाच्या संचाच्या थकीत अनुदानामुळे शेतकरी



संकटात सापडला आहे तरी सदर अनुदान त्वरित वितरित करावे नसता जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा परभणी जिल्हा काँग्रेस कमिटी कार्याध्यक्ष नानासाहेब राऊत यांनी जिल्हा कृषी अधिकारी कृषी कार्यालय परभणी यांना एका निवेदनाद्वारे दिला आहे निवेदनाच्या प्रती उपविभागीय कृषी अधिकारी परभणी व तालुका कृषी अधिकारी जिंतूर यांना देण्यात आल्या आहेत.

# क्रांतिदिनानिमित्त क्रांतिवीरांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दि.९ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शहर जिल्हा औरंगाबादच्या वतीने भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात स्वतःच्या प्राणांचीही पर्वा न करता. आपले आयुष्य वेचलेल्या क्रांतिवीरांना क्रांतीदिनी बळीराम पाटील शाळेसमोर सिडको एन ९ औरंगाबाद येथे क्रांतिवीर लहुजी साळवे यांच्या पुतळ्याला श्री दिपक म्हस्के (शहर उपाध्यक्ष) यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी दशरथ मानवतकर (प्रदेश



उपाध्यक्ष सेवादल )यांनी क्रांतिवीरांचे विचार मांडताना म्हणाले क्रांतिवीरांनी जीवाची पर्वा न करता कसे लढले थोडक्यात माहिती सांगितली. यावेळी प्रमुख उपस्थितीत गंगाराम शेजुळ, रमेश वाघ, भीमराव आढाव, रामचंद्र पाचवणे, बाळू तांबे, अशोक धनेधर, प्रल्हाद सहाने, कैलास साळुंके इत्यादी.

# अनिल गोटेंचा राष्ट्रवादी काँग्रेसला रामराम

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पक्षीय गटबाजीच्या राजकारणासाठी आपण अपात्र आहोत. यामुळे अशा गटबाजीला कंटाळूनच राष्ट्रवादीतून स्वखुशीने बाहेर पडलो, असे माजी आमदार तथा प्रदेश उपाध्यक्ष (शरद पवार) अनिल गोटे यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) प्रदेश उपाध्यक्ष व धुळे-नंदुरबार प्रभारी पदाची जबाबदारी पक्षाने गोटे यांच्याकडे सोपविली होती. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडे गोटे यांनी राजीनामा दिला आहे.

गोटे यांनी म्हटले आहे, की भाजपमधील गटबाजी, गुंडाना खुलेआम समर्थन व संरक्षण तसेच प्रोत्साहन देण्याच्या मनोवृत्तीस कंटाळून आपण मुदतपूर्व विधानसभा सदस्यत्वाचा व पक्षाचा राजीनामा देवून बाहेर पडलो होतो. राष्ट्रवादीत स्वेच्छेने प्रवेश घेतला. सलग चार वर्षे शरद पवारांचे नेतृत्व स्विकारले अर्थात लोकसंग्रामच्या सर्वच कार्यकत्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काम करण्याचा माझा निर्णय मान्य होता असे नाही. पण केवळ माझ्या प्रेमापोटी सर्वच कार्यकर्त्यांनी आपली नाराजी माझे जवळ स्पष्ट शब्दात बोलून दाखविली. त्याच बरोबर 'तुम्ही जेथे आम्ही तेथे' अशी भूमिका स्विकारुन माझ्या समवेत राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षात कार्यरत झाले, असे गोटे यांनी सांगितले. पक्षासाठी केलेल्या कार्यक्रमांचा त्यांनी यावेळी सविस्तर उल्लेख केला.दरम्यान, शिंदखेड्याचे आमदार माजी मंत्री जयकुमार रावल यांच्या अवास्तव प्रशासकीय हस्तक्षेपाने दोंडाईचा, शिंदखेडा मतदार संघातील जनता त्रस्त झाली होती. असे गोटे यांनी म्हटले आहे. यामुळे आपण 'दहशतवाद मुक्त शिंदखेडा मतदार संघ' ही भुमिका गावोगाव मांडल्याची आठवण करून दिली.




महाराष्ट्र Business Katta












# भारताचे स्वातंत्र्य चिरायु होवो !



मधुकर ए. निलेगावकर
संपर्क क्र. : ९४२१३७५६९१

आधुनिक केसरी

**भारताच्या ७५व्या अम्रुतमहोत्सवी वर्षानंतर ७६व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त सर्व भारतीयांना स्वातंत्र्यदिनाच्या खूप हार्दिक शुभेच्छा! हिंदूस्थानाला, म्हणजेच भारताला स्वातंत्र्य मिळून पंधरा ऑगष्ट २०२२ ला ७५ वर्षे पुर्ण झाली आहेत. स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष वर्षभर साजरे केले गेले. यावर्षी भारताच्या स्वातंत्र्याला ७६वर्षेपुर्ण झाली आहेत. या ७६ वर्षात आपण किती स्वातंत्र्य उपभोगले आणि उपभोगत आहोत याचा सर्वांनी साकल्याने अंतर्यामी विचार करणे खूप आवश्यक आहे. या ७६ वर्षात भारत देशाच्या सिमेलगतच्या देशांकडून अनेक आक्रमणे झाली, चीन व पाकिस्तानशी युद्धही झाले. भारताच्या शूर जवानांनी प्राणपणाने लढून ती आक्रमणे परतवून लावली. त्यात, बरेच जवान शहीदही झाले. तेव्हापासून, आजतागायत शेजारच्या राष्ट्रांकडून अतिरेकी कारवायाही चालूच आहेत.**

या ७६ वर्षांच्या कालावधीत भारताला अनेक थोर निष्णात व बुध्दीमान असे राष्ट्रपती व पंतप्रधान लाभलेले आहेत.तसेच, सध्याचे भारताचे पंतप्रधान मा.श्री. नरेंद्र मोदीजी हे अत्यंत हुशार ,चाणाक्ष व बुध्दीमान असे नेतृत्व भारताला लाभलेले आहे. त्यांच्या कार्यकाळात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताला सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, लष्करी, परराष्ट्रीय धोरणाबाबतीत, शांतता, सलोखा, समता व सुरक्षिततेबाबतीत अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. ही भारताच्या व भारताच्या सर्व जनतेच्या दृष्टीने अत्यंत अभिमानाची आणि गौरवाची बाब आहे.
इसवीसन १५व्या शतकापासूच भारतीय स्वातंत्र्य लढ्याची सुरुवात झाली. असे म्हटल्यास वावगे होणार नाही. कारण, उत्तर भारतात चितोडचा राजा राणा प्रतापसिंह, तसेच, झाशीची राणी लक्ष्मीबाई तसेच, इतर राजपूत राजानी त्यांच्या आयुष्याची पर्वा न करता शेवटपर्यंत निकराचा लढा दिला. झाशीची राणी तर पाठीवर झोळी मध्ये पोराला बांधून धैर्याने, शौर्याने शेवटच्या क्षणापर्यंत "मेरी झांसी नही दूंगी" म्हणत लढत राहिली. ही आपल्या हिंदूस्थान देशाची परंपरा आहे.हा स्वातंत्र्याचा लढा पूढेही चालूच राहिला. पूढे सोळाव्या शतकात भारतात एका क्रांतीपर्वाची सुरुवात झाली.भारतभूषण,महाराष्ट्रभूषण छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा जन्म झाला.
तेव्हापासूनच महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा झाला. महाराष्ट्रभूषण राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या उत्कृष्ट संस्कारांनी भारतभूषण छत्रपती श्री शिवाजी महाराजांनी तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले. अनेकानेक किल्ले बांधून, तसेच, मोगलांचे अनेक किल्ले जिंकून महाराष्ट्राचे स्वतःचे स्वराज्य स्थापन करुन ते समृद्ध केले.जात,पात, धर्म यांचा विचार न करता अठरापगड जातीच्या लोकांना एकत्र करुन श्री शिवाजी महाराजांनी स्वराज्य समृद्ध केले. स्वतःचा अहंपणा न ठेवता शिवाजीराजे! हे रयतेचे राज्य आहे असे म्हणत. आणि आयुष्यभर समस्त रयतेच्या कल्याणासाठी, सुखासाठीच ते आदिलशाही, मोगलशाही आणि इंग्रजांशी लढत राहिले. त्यांना त्यांच्या जवळच्या मराठा स्वकीयांनीच खूप त्रास दिला नाहीतर,त्यांनी तेव्हाच, संपूर्ण हिंदुस्थानात भगवा ध्वज फडकविला असता. छत्रपती संभाजीराजेही खूप शूरवीर होते. त्यांची समशेर प्रचंड वजनाची होती. तरी ते तिला सहजगत्या फिरवून शत्रूच्या चिंधड्या चिंधड्या करीत असत. परंतु, त्यांनाही स्वकियांच्याच घातकी कारवायांमुळे स्वराज्य भारतात सर्वत्र वाढविता आले नाही. तदनंतर, श्री राजारामराजे व त्यांची पत्नी ताराराणी यांनी स्वराज्याचा कारभार सांभाळला. परंतु, प्रकृती अस्वास्थ्यामुळे श्री राजाराम राजे जास्तकाळ राज्याचा कारभार पाहू शकले नाहीत. त्यांच्या निधनानंतर मात्र स्वराज्य रक्षक शूर, मर्दानी ताराराणी यांनी औरंगजेबाला सळो की पळो करुन सोडले आणि स्वराज्याचे रक्षण केले. त्यांच्याच कर्तृत्वाच्या कार्यकाळात औरंगजेबाचा मृत्यू झाला. एका दूष्ट राजवटीचा अंत झाला. नंतर छत्रपती श्री शाहू महाराजांनीही स्वराज्याचा कारभार अत्यंत उत्कृष्टपणे सांभाळला व स्वराज्याला समृध्द केले. नंतर पेशवे घराण्याने व श्रीमंत माधवराव पेशव्यांनी, स्वराज्याचा कारभार यशस्वीपणे सांभाळला. सतराव्या शतकाच्या शेवटी,१८व्या शतकापासूनच मात्र, भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्याची सुरुवात झाली. कारण, भारतावर इंग्रजांनी वर्चस्व मिळवून या देशावर आधिपत्य गाजवायला सुरुवात केली होती. त्या शतकातील सर्व जाती, धर्मांच्या क्रांतिकारकांनी तन, मन व धनाने स्वातंत्र्याचा लढा निकराने लढला.त्यांनी स्वतःच्या जीवाची व स्वतःच्या कुटुंबाच्या जीवाची पर्वा कधीही केली नाही. त्या सर्व स्वातंत्र्यवीरांना त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांनीही अत्यंत मोलाची साथ दिली. यात, श्री.वि.दा.सावरकर यांचा व त्यांच्या कुटुंबियांचा, लोकमान्य टिळकांचा व कुटुंबियांचा तसेच, भगतसिंग, सुखदेव,व राजगुरू, श्री.वासुदेव बळवंत फडके, चापेकर बंधू तसेच, संपूर्ण भारत देशातील इतर ज्ञात व अज्ञात स्वातंत्र्यवीरांचा अत्यंत मोलाचा सहभाग होता. हा स्वातंत्र्य लढा त्या शतकातील सर्वच्या सर्व स्वातंत्र्यवीरांनी अगदी स्वातंत्र्याच्या कळसापर्यंत नेऊन ठेवला. फक्त,स्वातंत्र्याच्या कळसाचा सूर्योदय होणे बाकी होते. ते स्वातंत्र्याच्या कळसाच्या सूर्योदयाचे काम १८व्या व १९व्या शतकातील शहीद झालेल्या व स्वातंत्र्य मिळाल्यावरही हयात असलेल्या स्वातंत्र्यवीरांनी तसेच, त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांनीही अत्यंत धाडसीपणाने स्वतःचे बलिदान करुन स्वातंत्र्यसूर्याचा कळस पुर्ण करुन भारताला पंधरा ऑगष्ट ,१९४७ रोजी स्वातंत्र्य मिळवून दिले. तो स्वातंत्र्याचा सूर्योदय पाहण्याचे सद्‌भाग्य श्री.वि.दा. सावरकर यांना त्यांच्या हयातीत लाभले. हा त्यांच्या आयुष्यातील तो अनमोल असा, अमृतयोग दिवस होता.तो दिवस अखंड भारताच्या दृष्टीने अत्यंत



महत्त्वाचा व सुवर्णअक्षरांनी लिहिण्यासारखा होता. म्हणूनच, १५ऑगष्टला संपुर्ण भारतात स्वातंत्र्यदिन साजरा केला जातो. भारतात इंग्रजांनी १५०वर्षे राज्य केले. इंग्रज जेव्हा भारतात आले तेव्हा, त्यांची संख्या फक्त १७९ एवढीच होती. नंतर ते १००० झाले. त्यानंतर १०००० झाले. त्यानंतर ते १,००,०००झाले. त्या एक लाख इंग्रजांनी भारताच्या ३० कोटी लोकांवर दीडशे वर्षे राज्य केले. हे त्यांना कसे शक्य झाले. तर त्याचं कारण म्हणजे त्यांनी भारताच्या लोकांच्या स्वभावाचा अभ्यास केला. त्यातून, त्यांनी जो निष्कर्ष काढला तो आज २०२३सालीही लागू होतो. तो निष्कर्ष म्हणजे! भारतीय लोकांना जातीभेद,धर्मभेद,प्रांतभेद, गरीब-श्रीमंत अशा गोष्टींमध्ये भडकवायचे! मग काय! तीस कोटीचे तिनशे करोड जरी हिंदू झाले तरी ते आपल्याविरुद्ध उठाव करु शकणार नाहीत. हे जाणून इंग्रजांनी राज्या- राज्याच्या माणसांमध्ये उपरोक्त विषयांमध्ये भांडणे लावली, द्वेष निर्माण केला म्हणजे, ते एकमेकांनाच मारत राहतील, ठार करतील ही कूटनिती इंग्रजांनी वापरली. त्यामुळे, भारतीय लोक आपापसातच लढत राहिले, तसेच, त्यांच्या सत्तेच्या जाचात राहिले. त्यामुळे, भारतीयांना दिडशे वर्षे इंग्रजांच्या गुलामीत राहावे लागले.
म्हणून,भारताच्या, महाराष्ट्राच्या नागरिकांनो अंतर्यामी लक्ष देवून नीट लक्षात घ्या. तुम्ही एवढे मोठे झाला आहात का! की तुम्ही महापुरुषांच्याही वाटण्या केल्या आहेत. पैगंबर मुसलमानांचे झाले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर बुद्धांचे झाले, सावरकर ब्राह्मणांचे झाले, मल्हारराव होळकर धनगरांचे झाले, महात्मा ज्योतिबा फुले माळ्यांचे झाले. इंग्रजांनी भारतीयांची केली वाताहत! भारतीयांना फसवले हातोहात! भारताच्या स्वातंत्र्याचा ७५वा अमृतमहोत्सव साजरा होवून ७६व्या स्वातंत्र्यदिनालाही अजूनही इंग्रजांनी केलेली भेदनीती अजूनही भारतीय जनतेच्या मनातून गेलेली नाही हेच दिसून येते. हीच भेदनीती राजकारण्यांनी आपल्या स्वार्थासाठी वापरली. अजूनही त्याच वृत्तीचा वापर राजकारण्यांकडून केला जातो आहे. या बाबीकडे सर्व भारतीयांनी अत्यंत गांभीर्याने लक्ष देण्याची नितांत आवश्यकता आहे. अशा त्यांच्या वृत्तीचा सर्व जनतेनी बिमोड केला पाहिजे.
अशीच वृत्ती जर आपली राहिली तर आपले स्वातंत्र्य अबाधित राहील का! याचा अंतर्यामी विचार करा! आणि आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवा. जातपात,धर्माच्या नावाखाली वादविवाद करु नकात.एकमेकांशी भांडू नकात. सध्या माणुसकी हाच धर्म आहे हे लक्षात ठेवा. तरच, भारतीय स्वातंत्र्य अबाधित राहील. हे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी १८व्या व१९व्या शतकातील आपल्या देशातील हजारो स्वातंत्र्य सैनिकांना आपल्या प्राणांचे बलिदान करावे लागले आहे. शेकडों स्वातंत्र्यसैनिकांना अंदमानच्या जेलमध्ये स्वातंत्र्यासाठी अत्यंत हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्या आहेत. इंग्रज सैनिकांचा अत्यंत क्रूर छळ सहन करावालागला आहे. थोर स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी त्यांच्या काव्यात स्वातंत्र्याविषयीची तळमळ व्यक्त केली आहे.ते म्हणतात, " ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला! तळमळला सागरा! ने मजसी ने! हीच भावना सर्व स्वातंत्र्यसैनिकांची होती. निर्दयी, क्रूर इंग्रज सैनिकांच्या हंटरच्या माराने झालेल्या रक्ताच्या जखमांतून देशप्रेमातून वि.दा.सावरकरांनी त्यांच्या काव्यातून ही भावना व्यक्त केली आहे. तीच भावना,तळमळ सर्व स्वातंत्र्यवीरांचीही होती. त्यांच्या रक्तातून, बलिदानातून मिळालेले स्वातंत्र्य आपण पुर्णतः अबाधित ठेवले पाहिजे. यात निष्काळजीपणा होता कामा नये हे लक्षात ठेवले पाहिजे.अन्यथा,तोडा फोडा आणि राज्य करा!ही नीती कोणिही अवलंबिल. हे अत्यंत गांभीर्याने लक्षात घ्या. तितक्याच तातडीने त्याची अंमलबजावणी करा बाहेरच्या देशातील कोणी घूसखोरी करण्याचा प्रयत्न केला तर त्यांचा प्रयत्न हाणून पाडा. तसेच, त्यांना त्यांच्यापेक्षा जास्त ताकदीने उत्तर द्याभारताच्या जवानांनी वेळोवेळी हे सिध्द केले आहे, आणि सिध्द करीत आहेत. फक्त समस्त भारतीयांनी लष्कराच्या जवानांना अत्यंत मोलाची साथ दिली पाहिजे, तसेच, सहकार्य केले पाहिजे. एका कवीने समर्पक शब्दांत भारताच्या सार्वभौमतेचे वर्णन केले आहे. "बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो! हे स्वातंत्र्य अखंडीतपणे राहण्यासाठी सामाजिक प्रबोधनाची अत्यंत आवश्यकता आहे. हे प्रत्येक भारतीयाच्या मनावर बिंबवले गेले पाहिजे. तरच,ख-या अर्थाने भारतीय स्वातंत्र्य अबाधित टिकून राहील, यात संशय नाही.
जय हिंद! जय महाराष्ट्र! जय स्वातंत्र्यसैनिक!
स्वातंत्र्यदिनानिमित्ताने व सर्व स्वातंत्र्यसैनिक, सैनिक व हुतात्मा झालेल्यांचे मनोगत यावर आधारित माझी स्वरचित कविता या निमित्ताने खूप उपयुक्त होईल. ती खालिलप्रमाणे आहे.

***"मनोगत स्वातंत्र्य सैनिकांचे, सैनिकांचे ,***
***देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांचे"***
***शतदा वंदन! तुम्हा स्वातंत्र्य सैनिकांनो!***
***सैनिकांनो! हुतात्म्यांनो!***
***मिळाले जे स्वातंत्र्य तुम्हा सकलांना***
***अबाधित ते भारतदेशी टिकवून ठेवा***
***जाणा!हजारो हुतात्म्यांच्या बलिदानाने***
***स्वातंत्र्य मिळाले आहे भारत देशाला,***
***म्हणूनि,घेतात उपभोग तुम्ही स्वातंत्र्याचा***
***अर्थ ध्यानी घ्या नीट,सैनिकांच्या कष्टाचा***
***आयुष्याचा क्षण क्षण वेचतात ते देशासाठी***
***रात्रंदिन झटतात भारतीयांच्या रक्षणासाठी***
***स्वकुटूंबाला सोडून लढतात दूर सीमेवर***
***मुलाबाळांवर प्रेम असते त्यांचेही अपार***
***परि, कर्तव्यापूढती नाते राहते खूप दूरदूर***
***ठसवून घ्या त्यांची शक्ती,भक्ती स्वहृदयावर***

# युवाशक्ती आणि प्रश्न



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**आज एकूण राजकीय परिस्थिती बघितली तर सैरभैर झालेली आहे. सत्तेसाठी राजकारण कसे सुरु आहे हे आपण बघतच आहे. आणि त्यात महत्त्वाचे प्रश्न जसे बेरोजगारी हा युवकांसोबतचा महत्त्वाचा प्रश्न आहे तो मात्र बाजूला पडत आहे. जसे शिक्षित युवक आहे त्यासमोर नोकरीचा प्रश्न आहे तसेच जो शिक्षित नाही परंतु शेती या फार मोठ्या व्यवसायात गुंतलेला आहे त्याच्या डोळ्यासमोर शेती पिकवणे आणि ती टिकवून ठेवणे यातच तो गुरफटला आहे, त्याचीही अनेक प्रश्न आहे ते सुद्धा बऱ्याच अंशी दुर्लक्षित राहतात. आपण म्हणतो देशाच्या प्रगतीचे सुकाणू युवकांच्या हाती आहे असे म्हटले जाते. भारत हा जगातील सगळ्यात मोठा तरुणांचा- युवकांचा देश आहे.भारतात पासष्ट टक्के युवकांची संख्या आहे,असे म्हटले जाते.युवापिढीचे क्षमतेवर, ताकतीवर भारतही जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पहात आहे.**

आजच्या परिस्थितीत काही ठरावीक युवा पिढीत नवीन शिकण्याची आवड आहे, जिद्दही आहे.देशाच्या विकासात त्यांचा सहभाग आहे.आज देशाच्या सीमेवर जाऊन आपल्या देशाच्या रक्षण करणारा देशभरातील युवकच आहे.त्याचा आपल्याला सार्थ अभिमान आहे.

जागतिक स्तरावर बारा ऑगस्ट हा दिवस "जागतिक युवा दिवस"म्हणून साजरा केला जातो. युवकांशी निगडीत काही विषयावर चर्चा घडवून आणली जाते. लिब्सन येथे ८ ते १२ ऑगस्ट १९९८ मध्ये पार पडलेल्या युवकांशी निगडीत मंत्र्यांच्या परिषदेत १२ ऑगस्ट जागतिक युवा दिवस साजरा करण्याची शिफारस केली गेली.आणि त्यावर १७ डिसेंबर १९९९ रोजी संयुक्त राष्ट्र महाससभेने शिक्कामोर्तब केले,तेव्हापासून १२ ऑगस्ट हा दिवस जागतिक युवा दिवस म्हणून साजरा होतो.

युवा दिवस साजरा करत असताना युवकांशी निगडीत काही,विषय/प्रश्नांची शासकिय आणि युवा पातळीवर चर्चा होणे आवश्यक वाटते.

काय आहेत ते प्रश्न ?
युवक आणि विद्यार्थि संघटना.
युवक आणि राजकीय संघटना
युवक आणि सोशल मिडिया.
युवक आणि राजकारण.
युवक आणि सामाजिक जाणिवा,जबाबदारी.
युवक आणि शेतीव्यवसाय.

महाविद्यालयीन स्तरीय युवकांच्या विद्यार्थी संघटना आहेत.एकेका महाविद्यालयात दोन/तिन/चार अशा संघटना बघायला मिळतात.ह्या संघटना कुठल्या ना कुठल्या पक्षाच्या अधिपत्याखाली कार्य करत असतात. त्यामुळेच पक्षापक्षातील मतभेद ह्याच्यातही पहायला मिळतात. विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवणे, अँडमिशन मधला, मग तो महविद्यालय,होस्टेलमध्ये अँडमिशन,जादा फीस आकारणी कडे लक्ष देऊन विद्यार्थी वर्गाला न्याय मिळवून देणे हे महत्वाचे काम संघटनेचे आहे.पण ह्यांचा अधिकतर वेळ वादातच जातो,बऱ्याच वेळा पोलिसा पर्यंतही वाद जातात. मुंबई, पुणे,दिल्ली, आदि अनेक ठिकाणच्या मागील काही काळात घडलेल्या घटनावरुन दिसते काय आणि किती हिंसक स्वरूप असते ते. राजकीय पक्षाच्या युवा संघटना,शाखा, आहेत.पण त्यात काही कोट्यावधी संख्येत युवकांचा सहभाग असतो. अगदीच नगण्य युवकांना कुठल्यातरी मंडळावर,सहकारी बँकेवर,जिल्हा परिषद, पंचायत समित्यावर त्यांची वर्णी लागते. त्यातही जवळचे कार्यकर्ते यांनाच संधी दिली जाते. बाकी युवक हे फक्त आधारस्तंभ असतात. त्यांना वापरून घेतले जात असते. हे आधारस्तंभ अधांतरीच असतात. त्यांच्या भवितव्याचा कुठलाही विचार त्यांच्याजवळ नसतो.

आजचा युवक इंटरनेट,मोबाईल, इन्स्टाग्राम, फेसबुक,वॉट्सप,अशा सोशल मिडियाच्या जाळ्यात नको तितका अडकला आहे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.हवा तेवढा उपयोग न घेता,नको तेवढा दुरूपयोग केला जातो.त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात युवक त्यात अडकून आत्ममग्न झालाय.चुकीचे दिशेने वापर होतोय.

कलाकार, खेळाडू, सेलीब्रेटीना मोठ्या रकमेचा मोबदला देवून ऑनलाईन गेमच्या जाहिराती केल्या जातात व तरुणांना आकर्षित केले जाते. हे गेम म्हणजे एक जुगारच असतो, तरुणांना विधायक कार्याकडे ओढण्या ऐवजी हे असले प्रकार तरुण पिढीचे दिशा बदलून टाकत आहे. आणि त्यांच्याभोवती अशा गेमचा विळखा घातला गेला आहे. त्यात तरुणपिढी बरबाद होत आहे. या गोष्टीकडे गंभीर पणे बघितले गेले पाहिजे आणि अशा प्रकारांवर बंदी आणायला हवी आहे. अनेक राज्यात यावर बंदी आहे. महाराष्ट्र सरकारला त्याची आवश्यकता वाटत नाही का ? युवकांच्या विकासाच्या योजनांचा विचार करत असताना अशा गोष्टींकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही.

संवाद कमी होतोय.वाचन कमी झालय. काही वेळेला युवकांमध्ये वैचारिक क्षिणता आल्याचे जाणवते. नविन तंत्रज्ञान मिळतय,सगळं जग जवळ आलय,पण माणसं हरवली आहे. मिडियाचा योग्य वापर करण्याची समज नाही...म्हणून वाटते विधायक वळण द्यायला हवे.राजकीय पक्ष तरूणांचा वापर निवडणूक कामी मोठ्या प्रमाणावर करुन घेतो. त्या बदल्यात काय मिळते ? ढाब्यावर मनसोक्त जेवण,अर्थातच खाणे पिणे.महिनादोन महिने फुकट मिळते पण व्यसन कायम चिकटते.यामुळेच खुप मोठा बेरोजगार तरुण वर्ग व्यसनाधीन होऊन पुढाऱ्यांमागे धावण्यात आपली उमेदवारी वर्ष वाया घालवतोय. अनेकांचे आयुष्य दिशाहीन झाले आहे.कारण कुठले न कुठले निवडणूका असतातच.रोजगार नसलेला लाखो करोडोच्या संख्येने युवक ह्यात गुरफटला आहे.आंदोलन, मोर्चे या कामीच त्यांचा फक्त वापर वर्षानुवर्षे करुन घेतला जातोय ही गंभीर बाब आहे. त्यातच त्याच्या समाजिक जाणिवा लोप पावत आहेत. समाजातला अत्याचार, भ्रष्टाचारा बद्दल त्याला काही घेणे देणे नाही.तो पेटून उठत नाही. त्यांच्या जाणिवा बोथट झाल्या आहेत. घरातल्या घरात खूनाचे प्रकार घडताय .कुठून आली आहे ही अस्वस्थता ? रोजगार नसल्याने फार मोठ्या संख्येने युवक अस्वस्थ आहे. ज्या ठिकाणी संधी उपलब्धता असते,तिथे पोहचत नाही किंवा टिकाव लागत नाही.वैचारिक क्षीणता यायला लागलीय. धुम्रपान,मद्यपानाचे आहारी जात आहे.गुटख्यावर बंदी असूनही अनेक ठिकाणी लाखोंच्या संख्येने साठा पकडला जातो. त्यामुळे युवापिढी बरबाद होतेय ह्याकडे दुर्लक्ष होते आहे.

एकीकडे शेतकरी युवक वर्ग आहे. सिस्टीम मधल्या भ्रष्टाचाराने तो गांजला आहे. खते,बियाणे,ह्यातही भ्रष्टाचार,बोगस बियाणे अनेक प्रश्नांनी तो ही त्रासला आहे.अनेक वर्षा पासूनचे प्रश्न आहेतच. वैचारिक क्षिणतेमुळे अनेक युवक आत्महत्त्या करताहेत. खर तर युवाशक्तित खूप सामर्थ्य नक्कीच आहे.स्वामी विवेकानंदाचे जयंतीलाही राष्ट्रीय युवा दिवस साजरा करतो.त्यांना युवाशक्तिवर खूप विश्वास होता.युवा शब्दातच वायु म्हणजे गती आहे.त्यांना संस्कारक्षम, कणखर, राष्ट्राप्रती,समाजाप्रती प्रेम,असणारा निर्व्यसनी युवक अपेक्षित होता,आहे.

युवा दिन साजरा करतांना ह्या सर्व गोष्टींची चर्चा,सर्वक्षेत्रातील युवकांना,युवा संघटनांना व्यासपीठ उपलब्ध करुन देऊन व्हायला हवी. युवकांची मन की बात ओळखायला हवी.

शासनाने बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन द्यायला हवा आहे.नवनविन संधी प्राप्त करुन द्यायला हव्यातच. हाच त्यावर एकमेव उपाय आहे.

नाही तर, राष्ट्राची ताकद म्हणून ज्या युवकां कडे आपण पहातो,ती युवापिढी राजकारण, सोशल मिडियाचे,निवडणूकीच्या,फेऱ्यात बरबाद होणार हे निश्चित. बेरोजगार, व्यसनाधीन युवकांचा देश व्हायला आता वेळ लागणार नाही. तशा काही युवकसंघटना चांगले कार्य करत आहेत, असतील,तरी ते खूप तोकडे आहे. आज आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत, तो करीत असताना या प्रश्नाकडे गंभीरपणे बघणे आणि विचार करणे अतिशय आवश्यक आहे. युवा दिन साजरा करतांना शासनाने-राजकीय नेत्यांनी ह्या गोष्टी प्रामुख्याने विचारात घ्यायला हव्या.युवा शक्तिला,युवा संघटनांना विधायक वळण द्यायला हवे हे मात्र नक्की.युवक हेच देशाचे खरे भांडवल आहे, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. आणि म्हणूनच त्यांच्या समस्या कडे त्यांना शिक्षणाप्रमाणे रोजगारसंधी मिळेल याकडे लक्ष दिल्यास ,युवकही परदेशी शिक्षणाकडे आकर्षित न होता देशातच राहून आपल्या ज्ञानाचा फायदा देईल यात शंका नाही.

# प्रीतभावनेचा भावस्पर्शी आविष्कार : ' अनामिक प्रीतफुले'

आधुनिक केसरी

**नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातल्या सुजायतपूरच्या कवयित्री सौ.सावित्री शेवाळकर यांचा ' फुलबाग ' व ' प्रीत सागर ' या दोन कविता संग्रहानंतर ' अनामिक प्रितफुले ' हा देखणा चारोळी संग्रह नुकताच गडचिरोलीच्या साहित्यमनू प्रकाशनातर्फे प्रकाशित झाला असून या संग्रहात प्रीतभावनेचा सहज सुंदर आविष्कार करणाऱ्या दोनशे आशयघन चारोळ्या आहेत.विशेष महत्त्वाची नि आनंददायक बाब म्हणजे यातील प्रत्येक चारोळीच्या चार ओळींतील पहिले अक्षर घेतले तर ' अनामिका ' हा शब्द तयार होतो. अर्थात प्रत्येक चारोळीतून ' अनामिका ' हा शब्द करणे हे एक मोठेच आव्हान होते, हे उघडच आहे.**

शिवाय प्रत्येक चारोळीतून अलवार प्रीतभावनेचा अकृत्रिम आविष्कारही अभिव्यक्त होणे येथे आवश्यकच होते.थोडक्यात ही काहीशी अवघड



वाटावी अशी लीलया साधण्यासाठी त्या कवीकडे पुरेसे लेखन कौशल्य नि उच्च प्रतीची प्रतिभा असणे गरजेचे असते.नाहीतर अशा प्रकारच्या आव्हानात्मक लेखनात कृत्रिमता येऊन लेखनात कम अस्सल होण्याचा मोठा धोका असतो.पण विशेष आनंदाची बाब म्हणजे कवयित्री सौ.सावित्री शेवाळकर यांनी हे आव्हान इथे अगदी लीलया पेलले असून प्रत्येक चारोळीतून प्रीतभावनेचा सहज सुंदर आविष्कार करण्यात त्या यशस्वी झाल्या असल्याची सुखद अनुभूती हा संग्रह वाचून येते. उदा.प्रेम या अलवार भावनेचा अंतःकरणात झालेला सुखद साक्षात्कार सहजपणे नोंदवताना कवयित्री एके ठिकाणी म्हणते :

**अश्रुंच्या मोत्याने जुळले**
**नात्याचे प्रीतबंध आपले**
**मिठीत शब्दांना घेऊन**
**काळजात तुला जपले ..**

.. प्रीतभावनेचा गोड स्पर्श हृदयी झाला की देहभान विसरले जाते आणि सख्याच्या मधूर नि हव्याशा सहवासाची आस मनी बळावतच जाते.ह्या नितांत सुंदर भावनेचा सहजतेने आविष्कार करताना कवयित्री म्हणते :

**अशीच बांधते शब्दात तुला**
**नात्याच्या हारात गुंफून माला**
**मिठीचा बांधून रेशमी झूला**
**काचेच्या हृदया करूनी खुला**

.. प्रीतभावनेची एकदा का बाधा झाली की , मग त्या दोघांनाही एकमेकांचा क्षणभरही विरह सहन होत नाही.अशा वेळी मग दोघांनाही एक दुसऱ्यास खंबीर साथ देण्याची ग्वाही द्यावी लागते आणि त्यांचे अंतःकरण मिलनासाठी उत्सूक राहते.त्यांची ही घुसमटीची भावावस्था नेमकेपणाने टिपताना कवयित्री लिहितेः

**अश्रू माझ्या**
**आठवांचे**
**ना आणूस तू नयनी**
**मी झेलीन तुझा**
**दुरावा**
**का झुरतोस तू मनी ?**

.. अशी मिलनोत्सुक ही मने असले तरी सामाजिक रुढी नि संकेतांमुळे त्यांची वाट दुस्तर नि अप्राप्य असते तेंव्हा दोघेही एकमेकांना धीर देतात आणि सर्व अडचणी नि अडथळ्यांवर मात करण्यासाठी कार्यरत राहतात. अशा जीवघेण्या घुसमटीत दोघेही एकमेकांवरील विश्वास अभंग ठेवतात.त्या दोघांतील हा अव्दैतभाव शब्दबद्ध करताना कवयित्री म्हणते :

**अबोल तुझे वागणे**
**नांव जपतो श्वास माझा**




**मिळे ना**
**जरी सहवास**
**कायम**
**मजवर**
**विश्वास**
**तुझा ..**

.. असा दृढ विश्वास दोघांचा एकमेकांवर असला तरी त्यांच्यातही कधीतरी रुसवे-फुगवे होतात आणि मग मनात अबोला निर्माण होतो. अंतर्मनाची ही नाजूक भावावस्था नोंदवताना कवयित्री म्हणते :

**अबोला हा कशाचा**
**नाराज नको होऊ**
**मिठीत मनाच्या**
**कायम एकत्र राहू ..**

.. एकूणात कवयित्री सौ.सावित्री शेवाळकर लिखित ' अनामिक प्रितफुले ' हा अनोखा चारोळी संग्रह प्रीतभावनेच्या विविध भावछटांचे साध्या नि सुलभ शब्दकळेमधे आविष्करण करणारा असून प्रत्येक चारोळीतील आद्याक्षराचा कवयित्रीने केलेला प्रयोग नाविन्यपूर्ण नि स्तुत्य आहे आणि त्यामुळे हा चारोळी संग्रह वाचनीय नि भावस्पर्शी झाला आहे. त्यासाठी कवयित्रीचे मनःपूर्वक अभिनंदन आणि त्यांच्या पुढील लेखनास हार्दिक शुभेच्छा ! !

**( चारोळी संग्रह ) - अनामिक प्रितफुले**
**कवयित्री - सौ.सावित्री शेवाळकर**
**प्रकाशक - साहित्यमनू प्रकाशन , गडचिरोली**
**पृष्ठे - ५८ मूल्य - १२०**

# पुलांवरून पाणी जातंय



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**पूल पाण्याखाली गेला,पुलावरून पाणी गेलं, गाडी पुलावरून पुरात वाहून गेली यांसारख्या अनेक बातम्या ऐकायला,वाचायला मिळत असतात. दरवर्षी पावसाळयात पुराच्या पाण्यात वाहून जाऊन अनेक निरपराध जीवांना जीव गमवावा लागत असतो. जोरदार पाऊस पडला की, दरड कोसळणे,पुरात गुरे, जनावरे, माणसे वाहून जाणे हे घडतच असते. नदी, ओढे, नाले यांना महापूर येतोय तर कमी उंचीच्या पुलावरून पुरजन्य परिस्थिती निर्माण होऊन पाणी जातय.**

अशा पाण्यातूनच लोकांकडून ये जा करावी लागत असते.अशातच वाहून जाण्याची जास्त भीती असते. नेमेची येतो पावसाळा तसेच पावसाळयात ज्या समस्या येत असतात.त्या समस्या सुद्धा उदभवतच असतात.

त्या येतच असतात. मात्र कळत नकळत अनेकांचे जीव घेऊन जात असतात.सरकारे अनेक आली गेली परंतु पावसाळ्यातील समस्येला रोखण्यासाठी कोणत्याही ठोस उपाय योजना करता आलेल्या नाहीत. जीव गेल्यानंतर यंत्रणा खडबडून जागे होत राहते. पावसाळ्यात मरण पावलेल्या लोकांना श्रद्धांजली वाहून मोकळं व्हायचं.आर्थिक मदतीची घोषणा करायची हे सगळं करायचं. परंतु पावसाळ्यातील हे बळी थांबविण्यासाठी कोणतेही विशेष प्रयत्न केले जात नाहीत. पावसाळ्यात रस्त्यावरून ये जा करणाऱ्या गाड्या व याच गाड्यातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सुखकर प्रवास करता यावा. यासाठी रस्ते मार्गातील पुल पुरजन्य परिस्थिती पासून सुरक्षित असले पाहिजेत.



पूल मजबूत असले पाहिजेत.कमी उंचीचे पुलच जास्त उंचीचे असायला हवेत.ज्या पुलावरून पावसाळयात दरवर्षी पुराचे पाणी जाते.त्या पुलाबाबत गांभीर्याने दखल घेत पुलाचे सर्वेक्षण झाले पाहिजे.कृतिशील पाऊल म्हणून नव्या पुलांची उभारणी जास्त उंचीने कशा पद्धतीने करता येईल.यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.परंतु अशा पुलां कडे कोणतेही लक्ष दिले जात नाही.नदी काठच्या गावांना तसेच जिथे पुरजन्य परिस्थिती होऊ शकते.अशा ठिकाणच्या लोकवस्तीला सतर्कतेचा इशारा दिला जात असतो.पाण्याच्या प्रवाहातून न जाण्याच्या सूचना प्रशासनास द्यावा लागत असतात. परंतु जेव्हा चोहोबाजूने पाण्याचा वेढा घातला जातो तेव्हा लोकांनी करायचं तरी काय ? शहर गाव गल्ली केवळ सरकारी उपाययोजना प्रभावी न केल्यामुळे अशा समस्यांत अडकून पडत आहे. मोठं मोठ्या शहरात तर पाणीच पाणी होत आहे. पूर,महापूरजन्य परिस्थिती सगळीकडेच होत आहे. जनजीवन अगदी विस्कळीत होऊन चाललय.

मोठया प्रमाणात फटका बसतोय. मोठी जिवीतहानी होत आहे. गावातून बाहेर जाण्यासाठी जीवाची बाजी लावून अनेक जण धडपडत असतात.जीव मुठीत धरून शालेय विद्यार्थी सुद्धा पाण्यातून मार्ग काढत शाळेला जात असतात. अनेकांना जीवास मुकावे लागते. हे जीव जाण्यापासून वाचविता येऊ शकतात. कोणतीही समस्या असो,ती प्रत्येक समस्या सोडवण्यासाठी पर्याय असतो. परंतु शासन व प्रशासन यांच्या निष्काळजी पणा मुळेच मानवी जीवितहानी होणाऱ्या दुर्घटना घडून जातात.शासन प्रशासन तर जबाबदारच आहेच शिवाय मानवाने पाण्याच्या वाहत्या प्रवाहात अनेक अडथळे आणणारे अतिक्रमण सुद्धा केलेले आहे.याचे परिणाम मानवास भोगावे लागतच आहेत.

नदी,नाले, ओढे यांत सुद्धा वाहणाऱ्या वाहत्या प्रवाहातून जनतेने स्वतःच्या स्वार्थासाठी ठिक ठिकाणी केलेल्या अतिक्रमणा मुळे पाण्याच्या प्रवाहात अडथळे येऊ लागलेले आहेत. मुख्य प्रवाहा सोबतच पाण्याचे अनेक प्रवाह तयार होऊन जातात. त्यामुळे हेच पाणी लोकवस्ती मध्ये जाण्यास वेळ लागत नाही. बेसावध असणाऱ्यांना तर मृत्यूचा सामना करावा लागतोच.मुसळधार पावसात पाण्याची पातळी वाढते. गाव,शहर,

मोहल्यातून पाणीच पाणी येऊ लागते. अनेक छोट्या पुलांवरून पाणी जाऊ लागल्याने वाहतूक व्यवस्थेला तर ब्रेकच लागतो. अशातच लोक पाण्यातूनसुद्धा जाण्याचा प्रयत्न करत असतात.

वाढत्या पाण्याच्या प्रवाहातून चालत जाणारी माणसेच नव्हे तर गुरे ढोरे व मोटार गाडी सुद्धा वाहून जाण्याचे प्रकार घडलेले आहेत. परंतु या घडणाऱ्या प्रकारास पूर्णपणे ब्रेक लावणे आवश्यक आहे. गांव शहरांची इतर विकास कामे करताना कमी पुलांची जास्तीत जास्त उंची वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे नितांत गरजेचे होऊन बसलेले आहे. प्रत्येक पावसाळ्यात पुलावरून वारंवार पाणी जात असताना पुलांची उंची का वाढविली जात नाही ? हा प्रश्न आजही उपस्थित होतो. पुरात वाहून गेलेली प्रत्येक व्यक्ती ही इथल्या शासन व्यवस्थेने घेतलेली बळीच आहे.असे म्हणावे लागेल. गावा गावात मोठं मोठी सभागृहे, धार्मिक तीर्थक्षेत्र बांधण्यासाठी करोडो रुपये खर्च केले जातात.मग ज्या ठिकाणी, ज्या गावात, ज्या गावाच्या परिसरात दरवर्षी पुर सदृश्य परिस्थिती निर्माण होत असते.

अशा ठिकाणी त्या पुलांची उंची वाढविण्यासाठी का प्रयत्न होत नाहीत ? माणसाच्या सुरक्षिततेचा प्रश्न का महत्वाचा वाटत नाही ? पावसाळ्यात चांगली सुरक्षितता माणसांना उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी असून यावर विचार करणे महत्वाचे आहे. पुलावरून जात असलेल्या पाण्याची अशी वास्तवता दिसून येते की जरी पूर आला आणि त्या पुलावरून पाणी गेले तरी ते पाणी काही तासातच पुन्हा ओसरत असते. काही वेळेसाठी जनसंपर्क तुटला तरी पुन्हा जैसे थे परिस्थिती होत असल्याने पावसाळ्यातच छोट्या पुलाच्या अशा समस्या लोकांना भेडसावत असतात. ही अडचण तात्पुरती आहे.असा विचार सुद्धा अशा पुलांबाबत केला जात असेल.त्यामुळे असे पूल मोठ्या उंचीत बांधण्यासाठी प्रयत्न केले जात नाही. मुख्य रस्त्यावरील वाहतूक व्यवस्था जोपर्यंत काही दिवस ठप्प होऊन बसणार नाही. तोपर्यंत अशा पुलांकडे लक्ष दिले जाणार आहे.परंतु दरवर्षी राज्यातील पुलावरून वाहत असलेल्या पाण्यातून कुठे ना कुठे अनेकांचे जीव जात असतात. याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. यावर आता शासनाने कृतिशील पणे काम करायला हवे. खर तर पावसाळा सुरू होण्याआधी काही महिने किंवा महाराष्ट्रातील कोण कोणत्या पुलांवरून पुरजन्य परिस्थिती निर्माण होत असते. याची माहिती गोळा करून जिथे जिथे कमी उंचीचे पूल आहेत. तिथे तिथे उंची वाढवून पूल बांधण्यासाठी पावसाळा वगळता बाकीच्या महिन्यात प्रयत्न केले पाहिजेत.शासनाने आता राज्यातील कमी उंचीच्या पुलाचे सर्वेक्षण लवकरात लवकर करायला हवेत. राज्यातील कमी उंचीच्या पुलाला निधी भक्कम स्वरूपाचा देऊन मोठा पूल बांधण्यासाठीच निर्णय घ्यायला हवेत. पुलांवरून पाणी जातंय तर हीच परिस्थिती संपुष्टात आणण्यासाठी पुलांची उंची वाढवाच तरच दरवर्षी जाणारे हे बळी व पुलांवरून वाहणारे पाणी थांबणार आहे.

# जीवनात मैत्री अत्यंत महत्त्वाची!

आधुनिक केसरी

मैत्री या नावातच सारं काही जग सामावलेले आहे. रक्ताच्या नात्यापेक्षाही मैत्रीचे नाते सर्वाच्च मानले गेले आहे. मित्र हा आपल्या जिवनातील आधार असतो.तर मैत्री ही जिवनभराची संगीनी असते. ज्याच्यावळ आपण आपल्या मनातील सुख दुःखाची देवाणघेवाण करतो. ज्याच्याकडे हक्काने आपल्या मनातील गुपीते सांगतो तो खरा मित्र असतो. जिवनात चांगले मित्र जर लाभले तर नक्कीच आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवून येतो.



संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. ७७२१०४५८४५

त्यासाठी जिवनात चांगल्या मित्रांची संगती असावी. आपल्या जिवनात वाईट मित्रांची संगत जर लागली तर अधोगती होण्यास वेळ लागत नाही. तेव्हा मैत्री ही चांगल्या सकारात्मक विचार असणार्यांशीच करावी सकारात्मक विचारांचे मित्र लाभले तर जिवनात बदल घडवून आणु शकतो. मित्र हे आपल्याला मानसिक आधार देत असतात. जिवनात मैत्री ही अत्यंत महत्त्वाची आहे.

हृदय आणि मेंदू या दोन्हींमध्ये मैत्री ही मोलाची आहे. असं तज्ञ डॉक्टर सांगतात. मैत्री या पवित्र नात्यांमध्ये हृदय व मेंदू या अवयवांचा रोल महत्वाचा आहे.मेंदू व हृदय हे दोन घटक आपल्या शरीरातील महत्वाचे आहे. निखळ मैत्रीसाठी हे दोन घटक महत्त्वाचे आहेत. मैत्रीचा मिलाफ होण्यासाठी हृदयाचा संबंध येतो.आपल्या जिवनात मित्र चांगले लाभले तर आरोग्य पण चांगले राहते. मित्रपरीवाराच्या प्रोत्साहानामुळे माणुस आजाराला तसेच कोणत्याही संकटाला सामोरे जावू शकतो.

आपल्या जिवनात मित्र हे उभारी देण्याचे काम करीत असतात. आजारातुन बाहेर पडण्यासाठी मित्रांचे लाखमोलांचे शब्द हे खुप महत्वाचे असतात. मैत्री ही खुप महत्वाची आहे.आपल्या शरीरामध्ये पॉझिटिव्ह, निगेटिव्ह हार्मोन्स असतात. नकारात्मक परीणाम आल्यास त्याचे दुष्परिणाम हृदय आरोग्यावर होत असतात. त्यासाठी मैत्रीमध्ये विश्वास अत्यंत महत्वाचा आहे. मैत्रीमध्ये विश्वास उडाला तर नकारात्मकता वाढीस लागते. आपल्या सुख दुःखामध्ये मैत्रीचे नाते हे वेगळे असते. जिवनात निरपेक्ष मैत्री चांगली असणे गरजेचे आहे. मैत्रीमध्ये फायदा, लाभ, स्वार्थीपणाला थारा नसावा. मैत्री ही विश्वासावर अवलंबून असते. आयुष्यात आपण कितीही संपत्ती कमवा पण मित्र परीवार खुप मोठा असावा. आयुष्यात मित्र ही मोठी संपत्ती आहे. त्यासाठी जिवनात मैत्री ही अत्यंत महत्त्वाची आहे.



# मानसिक गुलाम मालकाला सलाम



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**देशामध्ये मानसिक गुलामांची संख्या एवढी वाढलेली आहे की लोकांचे बोलणे, कृत्य याचा विचार केला तर त्यांच्या बुद्धीची किव येते. मानसिक गुलामी किती घातक असते याचे ज्वलंत उदाहरणे आपण हल्ली पाहतो आहे. मानसिक गुलाम कधीच स्वतः चा मेंदु, तर्क, वापरत नाही. मालकाने सांगितले त्यावरच अंमल करून आपण मालका प्रती किती एकनिष्ठ आहोत हे दाखवण्यासाठी तो तत्पर असतो. राजकीय पोळी भाजुन लोकशाही व संविधानाचा गैरवापर करणाऱ्या लोकांना देशात जागृत नागरिक नाही तर गुलाम नागरिक हवे आहेत. ज्याच्या आधारावर जनविकास व राष्ट्रहीत या मुद्द्यावर कोणी चर्चा करणार नाही व देशाची सत्ता हाती ठेवून देशाची लुट करायला सोपे जाईल.**

मानसिक गुलामांच्या जोरावरच देशात जातीय व धार्मिक दंगली घडवून आणल्या जातात त्याचाच परिणाम विषमता, द्वेष कायम राहुन माणुस माणसापासून दुर जाऊन धार्मिक कट्टरता निर्माण होते. धर्म धोक्यात आहे असे सांगुन माणसिक गुलामाचा वापर राजकीय हित जोपासण्यासाठी केला जातो. धर्माच्या व धर्मसंसक्षणाच्या नावावर जातीय दंगली घडून ज्या धर्म रक्षकांवर गुन्हे दाखल होतात त्यांच्या जमानती घेण्यासाठी एकही नेता, धार्मिक संघटना समोर येऊन पुढाकार घेत नाही. कारण लढणारे गुलाम आहेत हे त्यांना माहिती आहे. गुलामांना मदत जरी केली नाही तरीही ते मालकाशी एकनिष्ठ च राहतात याची जाणीव सत्तेची पोळी भाजणाऱ्या व धर्माला ढाल बनवून करोडो लोकांच्या जिवाशी खेळणाऱ्या लोकांना चांगले माहिती आहे. धर्माच्या नावाखाली माणसिक गुलाम बनलेले स्वतः च्या मेंदुचा वापर न करणारे काही गुलाम समुह स्वतः ला थोडा फार वैचारिक व अभ्यासु दाखवण्याचा प्रयत्न करतो. परंतु त्याचे विचार व बोलणे याला काहीच अर्थ, तर्क व आधार नसतो. मुळ विषयांवर बोलण्याची हिंमत होत नाही. केवळ द्वेष आणि विषमता प्रस्थापित होईल असे बोलणे याला वैचारिकता म्हणत नाहीत. फुले शाहु आंबेडकर यांचे खरचं खुप मोठे उपकार आपल्या देशावर आहेत. जर त्यांच्या विचाराने आपण वागलो तर देश एका दिवसात महासत्ता होईल. हि अतिशोक्ती नाही तर वास्तविक आहे. परंतु गुलामांनी फुले शाहु आंबेडकर यांना च जातीत बांधुन स्वतः च्या अकलेची क्षमता दाखवून दिली. जेथे फुले शाहू आंबेडकर असतात तेथे माणसिक गुलामी नसते, द्वेष विषमता नसते आणि धार्मिक व जातीय दंगली तर सोडुनच द्या. म्हणून ही व्यवस्था फुले शाहु आंबेडकर यांचे खरे विचार देशातील नागरिकांच्या मनात रुजुच देत नाही. म्हणून गुलामांची संख्या वाढत आहे. गुलामांची संख्या वाढत असल्याने देशात शिक्षण, आरोग्य, रोजगार, शिक्षण व महागाई यावर चर्चा होतच नाही. महत्वाचे विषय बाजूला सारून शुल्लक विषयावर वातावरण गरम करून मुळ मुद्यावरुन लक्ष विचलित करून देशाची लुट सुरू आहे. गुलामांना नेमकी चर्चा कशावर करावी याचेही भान नसते. दोन महिन्यापेक्षा जास्त काळ होऊनही मनीपुर सतत जळत आहे त्यावर मानसिक गुलाम व त्यांचे मालक एकही शब्द बोलायला तयार नाहीत. बेरोजगारी, महागाई वाढून जनता आर्थिक बाजुने होरपळत आहे त्यावर कोणी बोलत नाही. स्वतः ला राष्ट्रभक्त समजणारे लोक देशाचा राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, नाकारणाऱ्या व गांधी यांच्या वडीलांवर संशय घेणाऱ्या, महात्मा फुलेंबद्दल चुकीचे विधान करणाऱ्या मनोहर कुलकर्णी च्या बाजुने उभे राहतात तेव्हा मात्र यांची गुलामी किती खोलवर गेली याची प्रचिती येते. मणिपूरचा साधा निषेधही न करणारे गुलाम मनोहर कुळकर्णी साठी रस्त्यावर येऊन आंदोलन करत आहेत. माणसिक गुलामांना आपला व देशाचा शत्रु कोण ? कोणाचा विरोध कशासाठी व का करायचा याचे काहीच भान नसते. कारण मालकाने सांगितले तरच हे उड्या मारतात नाहीतर शांत बसतात. एखादा व्यक्ती बरोबर आहे की चुक आहे हे गुलाम कधीच ठरवत नसतात. ते केवळ मालकाच्या इशाऱ्यावर नाचतात. मालकही वेळोवेळी गुलामांचा वापर करून घेण्यासाठी कोणतेही परंतु कोणताच फायदा नसणारे विषय उकरून काढून त्यावर गोंधळ निर्माण करत असतात जसे बऱ्याच दिवसापासून औरंगाबाद हा विषय जाणीव पुर्वक उचलून धरला जात आहे. त्यातून साध्य काहीच होणार नाही. परंतु वातावरण दुषीत केले जात आहे. औरंगजेब हा छत्रपती शिवरायांचा राजकीय शत्रु होता. ठिक आहे राजकीय शत्रु होता म्हणून आपण औरंगजेब याला शत्रु मानले. परंतु औरंगजेब राजकीय शत्रु होता म्हणून इतिहास पुसला जाणार का ? आणि औरंगजेब चा इतिहास पुसला तर छत्रपती शिवाजी महाराज कसे सांगणार ? मनीपुर जळताना, मनोहर कुळकर्णी राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, महात्मा फुले



यांच्या वर चुकीचे विधान करताना औरंगजेबाचा आधार घेऊन विषय का वळवला जातो ? मान्य केले औरंगजेब हा शिवरायांचा शत्रु होता म्हणून तो वाईटच, पण मनिपुर जळताना, महिलेची नग्न धिंड काढताना छत्रपती शिवाजी महाराज यांनी काय केले असते, नराधमांना कोणती शिक्षा दिली असती यावरही बोला ना. औरंगजेब चुकिचा होता यावर चर्चा केल्या पेक्षा छत्रपती शिवरांयाच्या कार्यावर का बोलले जात नाही. बर शत्रु नेमके माणायचे कोणाला हा मुळ प्रश्न गुलामांना कधीच पडत नाही. एखाद्या चे विचार आचार वाईट आहेत म्हणून गुलाम कधीच त्याला विरोध करत नाहीत. गुलामांचा विरोध आहे तो धार्मिक द्वेषाला. औरंगजेब याचा तिरस्कार हा औरंगजेब छत्रपती शिवरायांचा शत्रु होता म्हणून केला जात नाही तर औरंगजेब केवळ मुस्लिम होता म्हणून केला जातो हे अनेक उदाहरणामधुन दिसुन येतो. जर छत्रपती शिवाजी महाराज यांचे शत्रु हेच स्वराजाचे खरे शत्रु माणले तर कृष्णा भास्कर कुलकर्णी ला अजूनही कोणी शिवाजी महाराज यांचे शत्रु म्हणून बोलले नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांना विरोध करणारे अनेक हिंदु धर्मातीलच होते त्यांना ही कधी शत्रु म्हणून बोलले नाही. म्हणजे औरंगजेब याचा तिरस्कार करण्याची नेमके मुद्दे कोणते. आणि ज्या मुद्यावर औरंगजेब याला शत्रु माणले जाते तेच मुद्दे इतरांना लागु होतात का ? जर तेच मुद्दे इतरांना लागु होत नसतील तर आणि औरंगजेब ला केवळ मुसलमान म्हणून टार्गेट केले जात असेल तर हा छत्रपती शिवरायांचा अवमान नाही का ? नेहमी नेहमी स्वराज्याचा शत्रु असलेल्या औरंगजेबवर चर्चा केल्या पेक्षा छत्रपती शिवरायांवर चर्चा का होत नाही ? असे प्रश्न असले तरीही गुलामांना मात्र एकही प्रश्न पडत नाही. अलीकडे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते भालचंद्र नेमाडे यांनी औरंगजेब याच्या बद्दल एक वक्तव्य करून औरंगजेब याने सतीची प्रथा बंद केल्याचा उल्लेख केला. एवढ्या मोठ्या अभ्यासकाने उल्लेख केला म्हणजे कुठे तरी आधार असेल च. परंतु काही गुलामांनी सतीची प्रथा औरंगजेब याने बंद केली च नाही असे सांगुन नेमाडे यांना लक्ष करून औरंगजेब याला क्रुर ठरवले जात आहे. भालचंद्र नेमाडे यांच्या सतीच्या वक्तव्यावरून गुलामांनी जी प्रतिक्रिया द्यायला सुरुवात केली त्यावरून असे दिसते कि सतीची प्रथा खरचं समाजाला कलंक होती. महीलांवर अन्याय करणारी होती. मग जर सतीची प्रथा घातक होती, ती औरंगजेब याने बंद केली नाही हे दोन्ही विधान जर सत्य मानले तर सतीची प्रथा सुरू करणारे आणि प्रथा बंद होऊच नये म्हणुन प्रयत्न करणाऱ्यांना तर महिलांचे शत्रु म्हणायला पाहिजे. सती प्रथेवरून महिला प्रेम व औरंगजेब द्वेष दाखवणारे गुलाम महिलांना गुलाम कोणी बनवले ? त्यांचे शिक्षण, हक्क अधिकार कोणी नाकारले ? महिला शिक्षणाला विरोध कोणी केला ? महिलांबद्दल अवमानकारक लिखाण कोणी केले यावर कधी बोलतील का ? औरंगजेब हा छत्रपती शिवाजी महाराज यांचा शत्रु होता म्हणून त्याचा तिरस्कार करणारे गुलाम ज्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची समाधी शोधुन काढली व गौरव करण्यासाठी पोवाडा लिहला त्या महात्मा फुलेंचा स्विकार करतात का ? महात्मा फुले यांनी समाधी शोधून काढून जेव्हा शिवरायांच्या समाधीला फुलं अर्पण करून वंदन करत होते तेव्हा समाधीवरील फुलं बाजूला सारणाऱ्याला अजून शत्रु संबोधून त्याचा तिरस्कार केला गेला नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेऊन औरंगजेब केवळ मुस्लिम होता म्हणून त्याचा तिरस्कार करणे हाच सर्वात मोठा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचाराचा अवमान आहे. छत्रपती शिवरायांची शिकवण आम्हाला कधी कळालीच नाही. शत्रु ची कबर बांधणारे आमचे महान मानवतावादी छत्रपती शिवाजी महाराज होते. परंतु कबरी वरून वातावरण दुषीत करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांचे मावळे होऊच शकत नाहीत. अठरा पगड जातीतील लोकांना एकत्र करून मावळा ओळख निर्माण करून जातीधर्मा मध्ये बंधुभाव निर्माण करून आदर्श समाजव्यवस्था निर्माण केली. परंतु आज त्याच छत्रपती शिवरायांच्या राज्यात छत्रपतीच्याच नावाचा वापर करून सामाजिक द्वेष पेरला जातो कारण आजही छत्रपती शिवाजी महाराज आम्हाला कळाले नाही. मेंदु, आणि शिक्षणाचा योग्य वापर न केल्यामुळे आजही माणसिक गुलाम झाले आहेत. आणि हि गुलामी एवढी खोलवर जात आहे लोकांना खरे काय खोट काय. आपला कोणी वापर तर करून घेत नाही ना. धर्माच्या नावाखाली राजकीय नेते छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार बाजूला सारून स्वतः चेच विचार तर पेरत नाही ना याचेही भान राहीले नाही. केवळ गुलाम आज मालकाला सलाम करून कोणतेही कृत्य करायला तयार होतात आणि स्वतः चे आयुष्य अंधकार मय करतात. मालक मात्र धर्माच्या नावाखाली गुलामांना भावनिक बनवून त्यांच्या वापर केवळ आणि केवळ राजकीय सत्तेची पोळी भाजण्यासाठी करत आहेत. कोणाला असे वाटत असेल राजकीय नेते धर्माचे काम करत आहेत तर अस समजून जावे तुमचाही रस्ता गुलामीकडेच आहे.

# विकसित भारतदेश बनण्याचे स्वप्न



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असतानाच आगामी काळात देशाची वाटचाल कशी असावी? यावर मंथन व्हावे. भविष्याचा वेध घेताना या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या वीरांचेही स्मरण व्हावे आणि सन २०४७पर्यंत आपला देश विकसित देश म्हणून नावारुपाला यावा, यासाठी सर्वांच्या योगदानाची गरज आहे. आपल्या देशाच्या मातृभूमीविषयीची कायम कृतज्ञता आणि या वीरांना योगदानाचे स्मरण व्हावे म्हणून देशात "मेरी माट्टी, मेरा देश" अर्थात माझी माती माझा देश अभियान दि.९ ऑगस्ट २०२३पासून सुरू झाला आहे. त्यानिमित्त आपल्या राज्यातही विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेत. या उपक्रमात अधिकाधिक लोकसहभाग असावा यासाठीचे नियोजन करण्यात आले आहेत.**

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव या उपक्रमाचा सांगता सोहळा दि.९ ऑगस्टपासून सुरू करण्यात आला आहे. या सांगता सोहळ्याच्यानिमित्त राज्यात "मिट्टी को नमन, वीरों को वंदन" या घोषवाक्यासह देशभर आयोजित मेरी माटी, मेरा देश अर्थात माझी माती,माझा देश या अभियानाची सुरुवात झाली आहे. राज्यात ग्रामपंचायत, तालुकास्तर, जिल्हास्तर असे विविध उपक्रम त्यानिमित्त आयोजित केले जात आहेत. देशासाठी बलिदान दिलेल्या शहीद वीरांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि नमन करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. लोकप्रतिनिधी, प्रशासन, लोकसहभाग अशा सर्वांचा सहभाग यामध्ये राहणार आहे. पंच प्रण प्रतिज्ञा, वसुधा वंदन, वीरों को वंदन यांसारखे उपक्रम तसेच गाव, पंचायत, गट, शहर, नगरपालिका क्षेत्रातील स्थानिक शूरवीरांच्या त्यागाला वंदन करणारे शिलाफलक किंवा स्मारकफलक शहरी आणि ग्रामीण भागात उभारले जात आहेत. दि.९ ते ३० ऑगस्ट २०२३ दरम्यान, "मेरी माटी, मेरा देश" मोहिमेत गाव आणि गट स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्था तसेच राज्यस्तरावरही कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. दिल्लीत "अमृत वाटिका" तयार करण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून ७५०० कलशांमध्ये माती घेऊन अमृतकलश यात्रा काढण्यात येणार असून ही अमृत वाटिका "एक भारत श्रेष्ठ भारत" या वचनबद्धतेचे प्रतीक असणार आहे. जनसहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी सदर अभियानाच्या नावाने संकेतस्थळही सुरू करण्यात आले असून नागरिक माती किंवा मातीचा दिवा हाती धरून काढलेला सेल्फी या संकेतस्थळावर अपलोड करू शकणार आहेत. या उपक्रमात सर्वांचा सक्रीय सहभाग आणि आपल्या देशाच्या वीरांप्रतीची कृतज्ञता प्रत्येकाने व्यक्त करावयाची आहे. स्वातंत्र्यानंतरच्या अमृतमहोत्सवी काळात देशाने अनेक बाबतीत उत्तुंग झेप घेतली आहे. आता विकसित देश बनण्याच्या दृष्टीने प्रत्येकाचे या देशासाठी योगदान, गुलामगिरीची मानसिकता दूर करणे, समृद्ध वारशाचा अभिमान, एकता आणि बंधुता टिकवणे, नागरिकाची कर्तव्ये पार पाडणे आणि देशाचे रक्षण करणाऱ्यांप्रति आदर व्यक्त करणे यावर आधारित पंचप्रण प्रतिज्ञा या उपक्रमात घेण्यात येणार आहे. पंच प्रण प्रतिज्ञा अशी-

१ ) विकसित भारताचे लक्ष्य.
२ ) गुलामीच्या प्रत्येक अंगातून मुक्ती.
३ ) आपल्या विरासतीवर गर्व.
४ ) एकता आणि एकजूट.
५ ) नागरिकांत कर्तव्याची भावना.

मी अशी शपथ घेतली आहे की, १ ) भारताला विकसित देश बनवायचे आहे तसेच २०४७पर्यंत भारताला विकसित देश बनवण्याचं स्वप्न साकार करायचं आहे. २ ) गुलामगिरीची मानसिकता मुळापासून उखडून टाकायची आहे. ३ ) देशाच्या समृद्ध वारशाचा अभिमान बाळगायचा आहे. ४ ) एकता आणि एकजुटता यासाठी कर्तव्यदक्ष राहायचं आहे. आणि ५ ) नागरिकाचे कर्तव्य बजावायचं आहे तसेच देशाचं रक्षण करणाऱ्यांचा आदर ठेवायचा आहे. केवळ एखाद्या कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता गाव ते शहरांपर्यंत आपल्या मातीविषयी जनजागृती, प्रेम आणि साक्षरता निर्माण व्हावी याबाबत अभियान स्वरुपात कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. या अभियानात ग्रामीण स्तरावर ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी तसेच नागरी भागात नगरपंचायती, नगरपरिषदा, महानगरपालिका यांनी त्यांच्या स्तरावर अधिकाधिक लोकसहभागातून उपक्रम राबविण्याचे नियोजन केले आहे. तीन टप्प्यात हा उपक्रम राज्यात सर्वत्र राबविण्यात येणार आहे. राज्यस्तरावरील कार्यक्रमाची सुरुवात दि.९ ऑगस्ट रोजी ऑगस्ट क्रांती मैदान येथे सकाळी ९:३० वाजता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री. सांस्कृतिक कार्यमंत्री यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत झाला आहे. त्याचबरोबर त्याच दिवशी सकाळी १० वाजता मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगण येथे मंत्रालयातील सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी या मान्यवरांच्या उपस्थितीत पंचप्रण प्रतिज्ञा घेतली आहे.

ग्रामपंचायत स्तरः दि.९ ते १४ ऑगस्ट २०२३ या दरम्यान त्या त्या जिल्ह्यांच्या नियोजनाप्रमाणे कोणत्याही एका दिवशी खालील पाच उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. यामध्ये शिलाफलक, वीरांचा सन्मान, वसुधा वंदन- अमृत वाटिका, पंचप्रण शपथ, ध्वजारोहण व राषट्रगीत यांचा समावेश आहे.



शिलाफलकः शिलाफलकाची उभारणी करण्यात येणार आहे. त्यावर स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा लोगो, मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा व्हिजन २०४७ संदेश, स्थानिक शहीद वीरांची नावे, ग्रामपंचायत, शहराचे नाव, दिनांक याबाबी नमूद करण्यात येत आहेत. स्वातंत्र्यसैनिक, वीरांना वंदनः यावेळी स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार करण्यात येणार आहे. हौतात्म्य पत्करलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबियांचा सत्कार, संरक्षण, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि राज्य पोलीस दलातील सेवानिवृत्त व्यक्तींचा सत्कार या उपक्रमाच्या माध्यमातून केला जाणार आहे. वसुधा वंदनः यामध्ये गावातील योग्य जागा निवडून वसुधा वंदन म्हणून ७५ देशी वृक्षांच्या रोपांची लागवड करून अमृत वाटिका तयार करण्यात येत आहे. वन विभागाच्या समन्वयातून स्थानिक पातळीवर ही रोपे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

पंचप्रण-शपथ घेणेः देशाला विकसित बनवण्याचे स्वप्नं साकार करण्यासाठी ही प्रतिज्ञा घेतली जात आहे. ती अशी- "भारताला विकसित देश बनवायचे आहे. तसेच सन २०४७पर्यंत भारताला विकसित देश बनवण्याचं स्वप्न साकार करायचं आहे. गुलामगिरीची मानसिकता मुळापासून उखडून टाकायची आहे. देशाच्या समृद्ध वारशाचा अभिमान बाळगायचा आहे. एकता आणि एकजुटता यासाठी कर्तव्यदक्ष राहायचं आहे. नागरिकांचे कर्तव्य बजावयाचे आहे. तसेच देशाचे रक्षण करणाऱ्यांचा आदर ठेवायचा आहे", ही पंचप्रण- शपथ यावेळी घेतली जात आहे. यामध्ये सर्व शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी, माजी सैनिक, स्वयं सहायता महिला बचत गट, सर्व अधिकारी, कर्मचारी, शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी व शिक्षक वृंद, अशासकीय संस्था, नेहरू युवा केंद्र, विद्यार्थी सैनिक दल, राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी, ग्रामपंचायत स्तरावरील सर्व अधिकारी, कर्मचारी यांना सहभागी करून घेतले जात आहे. हातात दिवे लावून पंचप्रण शपथ घेण्यासाठी बचतगटाच्या माध्यमातून तयार केलेले मातीचे दिवे वापरावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. या कार्यक्रमादरम्यान ग्रामपंचायतीच्या हद्दीतील १-२ मूठ माती घेऊन सन्मानपूर्वक पंचायत समिती स्तरावरील समन्वयक अधिकारी यांच्याकडे ती सोपविण्यात येत आहे. स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्टला दरवर्षीप्रमाणे झेंडावंदन करण्यात येईल.

तालुका स्तरः दि.१६ ते २० ऑगस्ट २०२३ या कालावधीत पुढील उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. विविध गावागावांतून वसुधा वंदन कार्यक्रमातून जमा केलेली एक मूठ माती कलशामध्ये गोळा केली जाणार आहे. या कलशावर तालुका, जिल्हा व राज्याचे नाव लिहून हा मातीचा कलश दि.२७ ते ३० ऑगस्ट २०२३ या दरम्यान मा.पंतप्रधान महोदयांच्या कार्यक्रमासाठी दिल्ली येथे नेला जाणार आहे. त्यासाठी नेहरु युवा केंद्रातील युवकाची निवड करण्यात येणार आहे. दि.३० ऑगस्ट २०२३ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत कर्तव्य पथ, नवी दिल्ली येथे अभियानाचा समारोप समारंभ होणार आहे. याशिवाय, मागील वर्षी प्रमाणे यावर्षीही दि.१३ ते १५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत "हर घर तिरंगा" अर्थात घरोघरी तिरंगा उपक्रम राबविला जाणार आहे. सर्व नागरिकांनी या कालावधीत आपल्या घरांवर या दिवशी तिरंगा फडकावण्याचे आवाहन करण्यात येत आहे. त्याबरोबरच अशाप्रकारे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव अभियानाची सांगताही होत आहे.

!! सुजलाम् सुफलाम् भारत माता की जय !!




# आर्य चाणक्य प्राथमिक विद्या मंदिरामध्ये क्रांतिदिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर येथे क्रांती दिन संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने करण्यात आली. या कार्यक्रमासाठी लाभलेले अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी , प्रमुख पाहुणे विजय चाटुपळे ,तसेच मार्गदर्शक म्हणून विलास खर्डेकर व विनोद सरोदे यांची उपस्थिती लाभली. सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात शिवराज धनसुरे यांनी वैयक्तिक पद्यांनी केली. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रांतिकारकाची वेशभूषा केलेली होती. मार्गदर्शक विलास खर्डेकर जननायक बिर्सा मुंडा यांच्या विषयी विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. त्यांच्या आदिवासी भागातील कार्यांची ओळख यावेळी त्यांनी करून दिली. अशिक्षित आदिवासींवर इंग्रजांकडून होणारा अत्याचार पाहून इंग्रज अधिकाऱ्यांना धडा शिकवण्याचा विचार त्यांनी केला व इंग्रज अधिकाऱ्यांविरुद्ध केलेल्या चळवळींची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली तसेच विनोद सरोदे यांनी टंट्या भील क्रांतिकारकाविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली.यात अतिशय कमी वयात जवळपास १५ वर्ष इंग्रज अधिकाऱ्यांमध्ये कश्या प्रकारे दरारा निर्माण केला होता व त्यांच्या जवळच्याच आप्तिष्टांपासून त्यांना कसा धोका निर्माण झाला याची सविस्तर असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांसमोर मांडले व ही माहिती विद्यार्थ्यांनी एकाग्रचित्तेने ऐकून घेतली त्याचबरोबर कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात शाळेचे मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांनी क्रांतिकारकांविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली व क्रांतिकारकांचे गुण आपल्या अंगी कसे आणता येतील याचा प्रयत्न करण्यास सांगितले व विद्यार्थ्यांना विविध क्रांतिकारका विषयी माहिती गोळा करण्यास सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज शिंगारे तर ऋण आशिष होट्टे यांनी व्यक्त केले.



# रक्तदान शिबिर व युवासेना शाखेचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे समाजहित धोरण स्विकारून शिवसैनिक अमनभाऊ अंधेवार यांच्या वाढदिवसानिमित्त चंद्रपूर शिवसेना जिल्हाप्रमुख संदिपभाऊ गिर्हे यांच्या मार्गदर्शनाखाली ८ ऑगष्ट २०२३ रोज मंगळवारला इंदिरानगर येथे युवासेना शाखा उद्घाटन व भव्य रक्तदान शिबिर चंद्रपूर युवासेना जिल्हाप्रमुख विक्रांतभाऊ सहारे यांच्या द्वारा आयोजित करण्यात आले.

यावेळी युवतीसेना महाराष्ट्र राज्य सहसचिव रोहिणीताई पाटील, महाराष्ट्र राज्य विभागीय सचिव तथा गोंडवाना विद्यापीठ सिनेट सदस्य निलेशभाऊ बेलखेडे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख शालिकभाऊ फाले, शिवसेना माजी महानगरप्रमुख प्रमोदभाऊ पाटील, युवासेना उपजिल्हाप्रमुख रिझवान पठाण, सुमित अग्रवाल, सुजित पेंदोर, महिला आघाडी जिल्हासंघटीका उज्वलाताई नलगे, माजी जिल्हासंघटीका कुसुमताई उदार इंदिरा नगर शाखाप्रमुख पराग कुत्तरमारे, उपशाखाप्रमुख श्रीकांत दडमल शाखा सचिव अमित वाघमारे शाखा उपसचिव तुषार वारफडे यांच्यासह शेकडो शिवसैनिक उपस्थित होते.

# परराज्यात गेलेल्या प्रकल्पाविषयीच्या श्वेतपत्रिकेबाबत उत्तर द्या

## माधव भांडारी यांचे उद्धव ठाकरेंना आव्हान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** फॉक्सकॉन, एअरबस ,सॅफ्रन, बल्क ड्रग पार्क प्रकल्पांच्या गुंतवणूकदारांकडे कोणत्या मागण्या केल्यामुळे हे प्रकल्प राज्याबाहेर गेले, याचे उत्तर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व महाविकास आघाडीने द्यावे असे आव्हान भाजपा प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी यांनी बुधवारी दिले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत श्री.भांडारी बोलत होते. यावेळी माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन,सह-मुख्य प्रवक्ते अजित चव्हाण व प्रवक्ते ओमप्रकाश चौहान उपस्थित होते. भांडारी यांनी सांगितले की, पररराज्यात गेलेल्या प्रकल्पांबाबत राज्याच्या उद्योग विभागाने श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली आहे. ही श्वेतपत्रिका प्रसिद्ध होऊन पाच दिवस उलटले तरी उद्धव ठाकरे व महाविकास आघाडीच्या नेत्यांनी याबद्दल 'ब्र' देखील काढलेला नाही. या श्वेतपत्रिकेतून महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात राज्यातून उद्योग कसे बाहेर गेले हे कळून येते.

भांडारी म्हणाले की, अनेक महिन्यांपासून उद्योग परराज्यात गेल्यावरून मविआचे नेते बिनबुडाचे आरोप करत होते. प्रत्यक्षात मविआ सरकारचा वसुली कारभार आणि निष्क्रीयता यामुळेच प्रचंड रोजगार देण्याची क्षमता असलेले उद्योग परराज्यात गेले. गुंतवणूकदारांनी महाराष्ट्राकडे पाठ फिरवत आपले उद्योग परराज्यात स्थापित का केले याची इत्थंभूत माहिती महायुती सरकारमधील उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सभागृहात सादर केलेल्या श्वेतपत्रिकेमध्ये आहे असे भांडारी म्हणाले.

नाणार प्रकल्पात सर्वात मोठी गुंतवणूक असलेल्या सौदी अराम्को या तेल कंपनीने आता पाकिस्तानातील ग्वादर शहराची निवड केली आहे. नाणार प्रकल्पाला विरोध करण्यामागचा नेमका उद्देश काय होता असा सवाल देखील भांडारी यांनी केला. महायुती सरकारच्या पारदर्शक व गतिमान कारभारामुळे आजमितीला महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात विदेशी गुंतवणूक होत आहे. आता गुंतवणूकदारांकडून कोणीही हप्ते मागत नसल्यामुळेच अधिकाधीक उद्योग राज्यात येत असून महाराष्ट्र राज्य औद्योगिक क्षेत्रात पुन्हा अव्वल क्रमांकावर आले आहे, असे भांडारी यांनी नमूद केले.






# विश्व आदिवासी जागतिक दिवस उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील नरव्हाळ या गावात जिल्हा परिषद केंद्र शाळा, जागतिक आदिवासी दिनानिमित्ताने कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी शाळेचे मुलामुलींना प्रगतशील शिक्षणासाठी, कौशल्य नुसार मुलांच्या विकासात भर कशाप्रकारे करता येणार यासाठी आपण प्रयत्नशील असायला हवे असे प्रबोधन ही करण्यात आले आजच्या वर्तमान काळात शैक्षणिक विद्यार्थ्यांनी शालेय योजनांचा लाभ घेणे, व आदिवासी बांधवांनी शासकीय योजनेअंतर्गत येणाऱ्या सर्व योजनांचा लाभ घेऊन आपला विकास करणे, गोरगरीब आदिवासी कुटुंबांनी शासन स्तरावर येणारे घरकुल योजना, सामाजिक योजना, शैक्षणिक योजना, या सर्व योजनांचा लाभ ग्रामपंचायत स्तरावर आपण घ्यायला हवा असे सांगण्यात आले व आपल्या आदिवासी कुटुंबाचां विकास करायला हवा, असे मत आदिवासी टायगर सेना महाराष्ट्र राज्य सचिव ॲड. प्रवीण मोरे व्यक्त केले या कार्यक्रमाप्रसंगी मुख्याध्यापक,शिक्षक,शिक्षिका,अंगणवाडी सेविका व या कार्यक्रमात गोविंदा अहिरे, अनिल अहिरे, प्रकाश ठाकरे, व नरव्हाळ गावाचे उपसरपंच विनोद ठाकरे, ग्रामपंचायत सदस्य हेमलता अहिरे, तुकाराम ठाकरे, नामदेव मोरे, चुडामन ठाकरे, छोटू गायकवाड , गावातील सर्व नागरिक व आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# घरफोडी करणारे अट्टल चोरटे ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** जयवंत पांडुरंग जाधव, रा.नवापूर, ता. नवापूर, जि. नंदुरबार यांचे छोरीया टाऊन शिप, साक्री येथील घरात अज्ञात चोरट्यांनी घराचे कड़ी कोंडा तोडून चोरी केले असल्याबाबत फिर्याद दिल्याने दि.२४ जुलै रोजी साक्री पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरु होता.

सदर गुन्हा सराईत आरोपी १ ) हेमंत अनिल सोनवणे२ ) अनिल गणेश पवार ३ ) संदीप उर्फ तुलसीराम भिलु चौरे यांनी मिळून घोरपडी केली असलेबाबत खात्रीशिर माहिती मिळाल्याने पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांचे आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून त्यांचा शोध सुरु असतांना १ ) हेमंत अनिल सोनवणे वय २५ व्यवसाय मोटर सायकल गॅरेज, रा. धनेर ता. साक्री जि.धुळे २ ) अनिल गणेश पवार वय २४ व्यवसाय मजुरी रा. तोरणपुडी, ता.साक्री, जि.धुळे हे यांचा शोध घेवून त्यांना ताब्यात घेवून गुन्हयाबाबत विचारपुस करता त्यांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. तसेच स्थानिक पोलीस स्टेशन हददीत यापूर्वी देखील ०२ ठिकाणी घरफोडी केली असल्याचे कबुल केली असून अनेक गुन्हे उघडकीस आलेले आहे.

आरोपी क्र १ व २ यांना गुन्हयातील सोने चांदीचे मुददेमालाबाबत विचारपुस करता त्यांनी सदर मुददेमाल ४ ) भटू राजेंद्र सोनार रा. शिवाजी चौक, नंदुरबार व ५ ) केवल भटू सोनार, रा. शिवाजी चौक, नंदुरबार यांना विकला असल्याचे सांगितल्याने त्यांचा नंदुरबार येथे जावून शोध घेता केवल भटू सोनार हा मिळून आल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले असून १,००,०००/- रु रोख ( घरफोडी करताना चोरलेले आरोपी क्र १ व २ यांचे कडून जप्त ) ४०,०००/- रू किंमतीची होंडा ट्रीगर मोटर सायकल, ०५,०००/- रू किंमतीच्या चांदीच्या वस्तु त्यात चमचा, दोन ग्लास, दोन वाटी, एक दिवा असे १,४५,०००/- रु एकुण मुददेमाल आरोपीतांकडून जप्त करण्यात आला असून आरोपी नामे १ ) हेमंत अनिल सोनवणे, वय २५, व्यवसाय- मोटर सायकल गॅरेज, रा. धनेर, ता. साक्री, जि. धुळे २ ) अनिल गणेश पवार, वय २४ व्यवसाय मजुरी, रा. तोरणपुडी, ता. साक्री, जि.धुळे ३ ) केवल भट्ट सोनार, रा. शिवाजी चौक, नंदुरबार यांना पुढील तपासकामी साक्री पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले असून आरोपी ४ ) संदीप उर्फ तुलसीराम भिलु चीरे, रा.मचमाळ, ता. साक्री जि.धुळे व ५ ) भटू राजेंद्र सोनार रा. शिवाजी चौक, नंदुरबार यांचा शोध सुरु आहे.

# सापाच्या दंशाने मातेसह गर्भतील अर्भकाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जामोद :** तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या हनवतखेड येथे एका गर्भवती महिलेस कोब्रा सापाने दंश केल्याने महिला आणि तिच्या गर्भातील अर्भकास जीवास मुकावे लागले.

जळगाव जामोद तालुक्यातील 22 वर्षीय माता व तिच्या गर्भात असणाऱ्या चार महिन्याच्या अर्भकाचा झाल्याने मृत्यू झाल्याची घटना 8 ऑगस्ट रोजी दुपारी तीन वाजताच्या सुमारास घडली आहे. हनवतखेड येथील फुलाबाई सुनील डावर ही महिला घरात काम करत असताना तिला विषारी जातीच्या किंग कोब्रा जातीच्या सापाने दंश केला. त्यामुळे तिच्या नातेवाईकांनी तीला आसलगाव येथील समाजसेवक उल्हास माहोदे यांना माहिती दिली व त्यांनी ॲम्बुलन्स घेऊन सदर महिलेला उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय जळगाव जामोद येथे दाखल केले. परंतु वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर सदर महिलेला मृत घोषित केले सदर महिलेच्या शवविच्छेदन केल्यानंतर तिच्या गर्भात असणारे चार महिन्याचे स्त्री जातीचे अर्भक सुद्धा मृत आढळले शवविछेदन केल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या घटनेनंतर गावात हळहळ व्यक्त होत आहे.



# माझी माती-माझा देश अंतर्गत स्वातंत्र्य सैनिक व माजी सैनिकांचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** राज्यभरात "माझी माती-माझा देश"हा उपक्रम दि. ०९ऑगस्ट ते २०ऑगस्ट होत आहे,याचाच एक भाग म्हणून वैजापूर नगर परिषदेने शासन पत्र नुसार बुधवार( ता. ०९ )रोजी येथील हुतात्मा स्मारकात शहरातील स्वातंत्र्य सैनिक कुटुंबीय व माजी सैनिक, शहरवाशी यांना निमंत्रित करण्यात आले भारताला आत्मनिर्भर करण्याचा देशाची एकात्मता बलशाली करण्याची। समृध्द वारशा चा गौरव करण्याची " पंचप्रण" प्रतिज्ञा त्याना धोंडीराम राजपूत यांनी दिली, तसेच स्वातंत्र्य सैनिक कुटुंबीय श्रीमती कमल ताई लोंढे व श्रीमती भोसले ताई यांना व माजी सैनिक यांनाही पुष्पगुछ देऊन गौरव केला,पालिका प्रशासक भागवत बिघोत व उपमुख्याधिकारी राहुल साठे यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील कार्यक्रम आयोजित करण्यात आला,उपनगराध्यक्ष साबेरखान,माजी नगर सेवक दशरथ बनकर, गणेश खैरे, हाजी इम्रान कुरेशी व माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांची प्रमुख उपस्थिती होती.

त्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन माजी सैनिक यांचा गौरव केला गेला, पालिका भांडारपाल वाल्मिक शेटे, सुनिल भाग्यवंत, पालिका अभियंता प्रकाश पाटील,सर्वश्री चिमटे, श्री, शेळके,श्री, मोदानी,श्री,शिंदे,तसेच विनोद शिनगारे, जयपाल राजपूत, वैद्यकीय अधिकारी डॉ,सविता निकाळे, मंजिरी खैरे,निर्मला जाधव,श्रीमंती सिरसाट, विष्णू आलूले, शंकर जोरे,अरुण कुलकर्णी,यांच्या सह माजी सैनिक संघटनेचे ॲड,धरमसिंह राजपूत, अध्यक्ष गौतम गायकवाड,व ३५माजी सैनिक यांचा गौरव करण्यात आला.

# आरोग्य संवर्धनासाठी रानभज्या उपयुक्त; रानभाज्या महोत्सवामार्फत प्रचार व प्रसार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** धकाधकीच्या व धावपळीच्या जीवनात अयोग्य व अवेळी खानपान तसेच वाढलेली रोगराई यासाठी रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी रानभाज्यांचा समावेश आहारात केल्यास बऱ्याच प्रकारच्या रोगांना अटकाव येतो व रोगप्रतिकार शक्ति वाढते. अशी माहिती मोहनलाल हरणे तहसीलदार सोयगाव यांनी दिली व कार्यक्रमाचे उद्‌घाटन केले.

तालुका कृषि अधिकारी मदन सिसोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली बचत भवन सभागृह पंचायत समिती सोयगाव येथे रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी मोहनलाल हरणे तहसीलदार सोयगाव, संपत वाघ मंडळ कृषि अधिकारी बनोटी, जे.के. सुरे व व्ही.टी.जाधव नायब तहसीलदार सोयगाव, अमोल महाजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक सोयगाव, हेमंत देशमुख कृषि पर्यवेक्षक सोयगाव, ए. जी. पैठणे पंचायत समिती सोयगाव, सर्व कृषि पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक आणि तालुक्यातील रानभाजी उत्पादित करणारे शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रस्ताविकात संपत वाघ मंडळ कृषि अधिकारी बनोटी यांनी सांगितले कि आदिवासी दिनाचे औचित्य साधून राज्यात दि.०९-०८-२०२३ ते दि.१५-०८-२०२३ या कालावधीत सदरील कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना प्राप्त झाल्या होत्या त्यानुसार आज रोजी दिनांक - ०९-०८-२०२३ सोयगाव येथे सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. सदरील कार्यक्रमात रानभाज्यांचे औषधी गुणधर्म तसेच शरीराला मिळणाऱ्या पौष्टिक घटकांची माहिती शेतकरी वर्गाला तसेच महोत्सवाला भेट देणाऱ्या नागरिकांना देण्यात आली. तसेच अमोल महाजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी कार्यक्रमास आलेल्या शेतकरी वर्गास रानभाजी लागवडीचे क्षेत्र वाढविण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन ए एस बावस्कर कृषि सहाय्यक, धनवट यांनी केले व के व्ही कुमावत कृषि सहाय्यक वरठाण यांनी आभार प्रदर्शन केले.



# मध्य रेल्वेच्या ९ ते २३ ऑगस्टदरम्यान १९ गाड्या रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** मुंबई-हावडा मध्य रेल्वेच्या चौथ्या मार्गाला सक्ती रेल्वे स्थानकाशी जोडण्याचा आणि या स्थानकाच्या 'यार्ड रिमॉडेलिंग'चे काम करण्याचा निर्णय रेल्वेने घेतला आहे. हे पूर्ण करण्यासाठी गाड्यांचे संचालन थांबवावे लागणार आहे. ९ ते २३ ऑगस्टपर्यंत वेगवेगळ्या तारखांना १९ गाड्या रद्द राहतील. रेल्वेने प्रभावित गाड्यांसंबंधी माहिती प्रसिद्ध केली आहे. यामुळे मध्य रेल्वे मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना चांगलाच अडचणीचा सामना करावा लागणार आहे. हावडा-मुंबई मुख्य मार्गावर सक्ती रेल्वेस्थानक आहे. नागपूर ते बिलासपूर आणि येथून झारसुगुडा या मार्गावर चौथा मार्ग टाकण्यात येत आहे. यातील काही विभागांमध्ये चौथ्या मार्गाचे काम पूर्ण झाले आहे. या मार्गासोबतच त्यामध्ये गाड्यांची वाहतूकही सुरू करण्यात आली आहे. याअंतर्गत सक्ती रेल्वेस्थानकाचे पुनर्निर्माण आणि या स्थानकाशी चौथी मार्गिका जोडण्याची तयारी सुरू आहे.

हे काम पूर्ण करण्यासाठी १० ते २२ ऑगस्ट दरम्यान सक्ती स्थानकावर 'नॉन इंटरलॉकिंग'चे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे ९ ते २३ ऑगस्टपर्यंत गाड्यांवर परिणाम होणार आहे. काही गाड्या १३ दिवस धावणार नाहीत. त्यामुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागणार आहे. मात्र, प्रवाशांची सोय लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने १० ते २२ ऑगस्ट दरम्यान सक्ती रेल्वे स्थानकाऐवजी जेठा पॅसेंजर हॉल्टवर गाड्या थांबविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.





# पूरग्रस्त बाधितांना मिळाली आर्थिक मदत

## पालकमंत्री मुनगंटीवार यांची क्विक ॲक्शन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जुलै महिन्यात अतिवृष्टीमूळे जिल्ह्यात हाहाकार माजला. यात चंद्रपूर महानगर पण पावसाने कवेत घेतले. अतिवृष्टी व बॅक वाटरने अनेकांच्या घरात शिरकाव केला. अश्या पुरग्रस्तांचे सर्व्हेक्षण करून त्यांना तातडीची मदत देण्याचे निर्देश पालमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले होते.

यासंदर्भातील सर्व्हेक्षण पूर्ण झाले असून आता पर्यंत 3700 कुटुंबापैकी 3300 कुटुंबांना 5000 रु प्रति कुटुंब मदत देण्यात आल्याने अनेकांच्या चेहऱ्यावर हास्य उमटले आहे. विशेष म्हणजे मुनगंटीवार यांच्या सूचनेप्रमाणे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष राहुल पावडे यांच्या नेतृत्वात महानगर भाजपाने पुरग्रस्तांना मदतीचा हात देत अनेकांना सुरक्षित स्थळी पोहचविले होते. हेच नाहीतर सर्व्हेक्षण दरम्यान अनेक पदाधिकाऱ्यांनी प्रशासनालाही मदतीचा हात दिला. यामुळे अल्पावधीतच पूरग्रस्तांना मदत मिळाली. पालकमंत्र्यांच्या या क्विक ऍक्शनचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

जुलै महिन्यात महानगरातील सिस्टर कॉलनी, रहेमत नगर, भवानीनगर, वृंदावन कॉलनी,परकर नगर, दूध डेरी परिसर,अष्टभुजा नगर, अष्टविनायक मागील परिसर,पठाणपुरा बिंनबा गेट या क्षेत्रात पाण्याचा शिरकाव झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते. अनेकांच्या घरात 3 ते 4 दिवस पाण्याने बस्तान मांडले. या लोकांच्या मदतीला भाजपा जिल्हाध्यक्ष राहूल पावडे यांच्या नेतृत्वात डॉ. मंगेश गुलवाडे, राखी कंचर्लावार, सुभाष कासंगोट्टूवार,रवींद्र गुरनुले, ब्रिजभूषण पाझारे, राहुल घोटेकर, देवानंद वाढई , प्रशांत चौधरी, रवी आसवाणी, विशाल निंबालकर, छबूताई वैरागडे, सविता कांबळे,वंदना तीखे, शीतल अत्राम,शीला चव्हाण, मायाताई उईके, कल्पना बगुळकर, चंद्रकला सोयाम, महेंद्र जुमडे, अजय सरकार, संदीप आगलावे, दिनकर सोमलकर, विठ्ठल डुकरे, सचिन कोतपल्लिवार, रवी लोणकर, प्रज्वालंत कडू,सूरज पेदुलवार,चांद सय्यद, सुषमा नागोसे, महेश राऊत, महेश झिटे, रामकुमार आकापेलिवार, धम्मप्रकाश भस्मे, राजेश यादव, प्रवीण उरकुडे, मनोज पोतराजे, सूरज सिंग, सागर भगत, आकाश मस्के, पप्पू बोपचे आदींनी मनपा आयुक्त व तहसीलदार यांना सोबत घेऊन पाहणी केली. गरजूंना जीवनावश्यक वस्तूंची मदत व सुरक्षितस्थळी हलविण्याचे काम सतत चालल्याने अनेकांचे मोठे नुकसान टाळले.सर्व्हेक्षणात 3700 कुटुंबियांना पुराचा फटका बसला असून यातील 3300 कुटुंबियांना त्यांच्या खात्यात पैसे टाकून शासनातर्फे मदत देण्यात आली आहे.



पुन्हा मिळणार शासनातर्फे 5000 रुपये मदत
अतिवृष्टी व पुरामुळे नुकसान झाले तर यापूर्वी सरकारकडून पाच हजाराचा धनादेश देण्यात येत होता . मात्र यामध्ये वाढ करून ही रकम 10 हजार करण्यात आली आहे . नुकसानग्रस्त कुटुंबाला प्रत्येकी दहा हजार रुपये मदत म्हणून शासनाकडून देण्यात येणार आहे . महानगरातील पूरग्रस्तांना लवकरच उर्वरित रकम पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या आदेशानुसार प्राप्त होणार आहेत, अशी माहिती भाजपा जिल्हाध्यक्ष राहुल पावडे यांनी दिली .



# अज्ञात व्यक्तीने पुन्हा एकदा जाळली कार

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** सचिन ठाकूर यांची मारुती सुझुकी सेलेरियो कार नंबर MH-46BV 2266 अज्ञात आरोपींनी जाळली. सचिन ठाकूर यांचे हे दुसऱ्यांदा वाहन जळाल्याने जसखार गावातील वाहनाच्या व नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वाहनाला लागलेली आग सचिन ठाकूर व त्यांच्या कुटुंबियांनी तसेच मित्रांनी लगेच विझविली. पुढे होणारा मोठा अनर्थ टळला. जवळच सीएनजी टॅंक होता व आजूबाजूला रिक्षा व इतर वाहने होती. मोठा स्फोट हाऊन इतर वाहनांना आग लागल्याची शक्यता होती. मात्र आग विझविण्यात आली. यात सुदैवाने कोणतेही जीवितहानी झाली नाही.अज्ञात व्यक्तीने वाहनाला आग लावल्याने या वेळीही सचिन ठाकूर यांना प्रचंड आर्थिक नुकसानाला सामोरे जावे लागले आहे. पहिली घटना घडली तेव्हाही सचिन ठाकूर यांनी न्हावा शेवा पोलीस ठाण्यात जाऊन अज्ञात व्यक्तीवर गुन्हा नोंदवून पाठपुरावा केला होता. मात्र पोलिस प्रशासना कडुन योग्य ते सहकार्य मिळाले नाही व आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाला. 5 जानेवारी 2023 रोजी व 7 ऑगस्ट 20213 रोजी सचिन ठाकूर यांचे वाहन अज्ञात व्यक्तीने जाळले. सदर अज्ञात व्यक्तीने अगोदर 5 जानेवारी 2023 रोजी व आता 7 ऑगस्ट 2023 रोजी वाहन जाळले. दोन्ही तारखेला वाहन जाळणारी अज्ञात व्यक्ती ही एकच असण्याची दाट शक्यता आहे. सुरवातीलाच पहिल्यांदा जेव्हा घटना घडली तेव्हा पोलीस प्रशासनाने योग्य ते शोध घेत आरोपीचा शोध घेतला असता तर आज ही वेळ आली नसती असे ठाकूर यांनी सांगितले.

# राष्ट्रसेवेचे उत्तम उदाहरण म्हणजे स्व. मदनदासजी : भैयाजी जोशी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आचरणातील शुद्धता, वैचारिक स्पष्टता आणि एकनिष्ठता ही स्व. मदनदासजी देवी यांच्या जीवनाची त्रिसूत्री होती. 'स्व' विसरणे सोपे नसते; पण मदनदासजींनी संघटनेसाठी जीवन समर्पित केले. राष्ट्र, समाज आणि देशसेवेत किती टोकापर्यंत जायला हवे, याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांचे जीवन होते, अशा शब्दांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य भैयाजी जोशी यांनी मदनदासजी यांना श्रद्धांजली अर्पण केली.

रा. स्व. संघ पुणे महानगर आणि बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भूतपूर्व सहसरकार्यवाह आणि अभाविपचे पूर्व राष्ट्रीय संघटन मंत्री स्व. मदनदासजी देवी यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सभेचे आयोजन फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये करण्यात आले होते. यावेळी भैयाजी जोशी बोलत होते. मदनदासजी शरीराने नसले, तरी त्यांनी घडविलेल्या कार्यकर्त्यांच्या रूपाने आपल्यातच आहेत. त्यांची कार्यशैली आत्मसात करून त्यांचे कार्य पुढे जात राहील, असे श्री. जोशी म्हणाले. संघटनेसाठी जे तत्त्वज्ञान मांडले गेले



ते मूर्तरूपात आणण्याचे फार मोठे काम त्यांनी केले. कार्यकर्त्यांची जडणघडण त्यांनी ज्या पद्धतीने केली ते पाहता असे म्हणता येईल की, त्या कार्यकर्ता जडणघडणीचे जे मुक्त विश्व विद्यालय आहे, त्यातील सर्व विभागांचे ते प्रमुख होते. मदनदासजी अत्यंत अर्थपूर्ण जीवन जगले असेही त्यांनी सांगितले. संघटनेचे कार्य करताना किंवा समाज जीवनातही काय नसले पाहिजे, हे सांगणारे खूप लोक असतात; परंतु मदनदासजी नेहमीच काय असले पाहिजे याची मांडणी करत असत. देश, समाजाची स्थिती आणि संघटनेच्या कार्याची स्थिती याची ते नेहमीच समीक्षात्मक चर्चा करत, असेही भैयाजी म्हणाले. व्यक्तीची पारख करण्याची अद्‌भूत क्षमता त्यांच्या अंगी होती. प्रत्येकाची क्षमता ओळखून त्या व्यक्तीचा उपयोग ते कार्यासाठी करून घेत आणि ही क्षमता त्यांनी आपल्या सहकाऱ्यांमध्ये संक्रमित केली, असेही ते म्हणाले. विद्यार्थी परिषदेचे अभ्यासवर्ग आणि अधिवेशने यांचा समारोप संघटनमंत्री या नात्याने मदनदासजी करत असत त्यावेळी त्यांचे जे भाषण असायचे, ते शब्द हृदयात कोरून ठेवावेत असे असत, असे मनोगत बी.एम.सी.सी. महाविद्यालयाचे माजी प्राचार्य अनिरुद्ध देशपांडे यांनी व्यक्त केले. निरहंकारी व्यक्तिमत्त्वाचा ते आदर्श वस्तूपाठ होते. 'माझे काही नाही' हा महनीय संस्कार मदनदासजींमध्ये पाहायला मिळायचा. सामाजिक कामाला आपल्या जीवनात अग्रस्थान दिले पाहिजे, हा विचार त्यांनी दिला, त्यांनी गृहस्थी कार्यकर्त्यांना जीवनदृष्टी दिली, असेही ते म्हणाले.

पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, जी व्यक्ती आपल्या संपर्कात येईल ती आपल्यापेक्षा आपल्या विचाराशी जोडली गेली पाहिजे, या भावनेतून मदनदासजी कार्य करत. प्रत्येकात काही ना काही गुण आहेत ते सर्व एकत्र करून संघटनेचे काम करायचे, हे त्यांच्या व्यवहारातून शिकायला मिळाले. त्यांच्या एकेका वाक्यातून जीवन व्यवहार कसा करायचा, हे समजत असे. विश्व हिंदू परिषदेचे प. महाराष्ट्र प्रांताचे कोषाध्यक्ष महेंद्र देवी, भारतीय मजदूर संघाच्या अखिल भारतीय कार्यकारिणीचे सदस्य चंद्रकांत धुमाळ, दृष्टि स्त्री अध्ययन प्रबोधन केंद्राच्या सचिव डॉ. अंजली देशपांडे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रा. आनंद काटीकर यांनी सूत्रसंचालन केले. संघाचे प. महाराष्ट्र प्रांत संघचालक प्रा. नाना जाधव, महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे, उपाध्यक्ष डॉ. रवींद्र आचार्य, विद्यार्थी परिषदेचे माजी अ.भा. सहसंघटनमंत्री सदाशिवराव देवधर आदिंची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

# अनुभव कोलुचा- स्वातंत्र्य सैनिकांना मानवंदना देण्याचा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष सरत असताना स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांच्या कैदेत अनेकांनी हालअपेष्टा सोसल्या. काहीजण फाशी गेले, बंदुकांच्या गोळ्यांना बळी पडले तर अगणित तुरुंगाच्या काळकोठरीत खितपत पडले. अमर्याद अनंत यातना भोगलेल्या असंख्य स्वातंत्र्यवीरांना स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या सहकार्याने राष्ट्रकुट मासिकाच्या वतीने स्वातंत्र्यवीरांना १९ आणि २० ऑगस्ट रोजी अनोखी मानवंदना देण्यात येणार आहे. स्वातंत्रोत्तर काळात जन्म घेतलेल्या पिढीला, जन्मठेपेत दिली जाणारी कोलूची शिक्षा काय असते. याचा अनुभव करून देऊन स्वातंत्र्य सैनिकांबद्दल आदर राखताना त्यांना अभिवादन करण्यात येणार आहे. शिवाजी पार्क येथे उपस्थित राहून कोलू फिरवणाऱ्यांना संस्थेच्या वतीने सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे असे प्रा महेश कुलकर्णी (उपसंपादक), राहुल येल्लापूरकर (सहसंपादक) यांनी घोषित केले आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर